रायगड, सोमवार दि.६ फेब्रुवारी, २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

'वंदे भारत' एक्स्प्रेसची चाचणी यशस्वी

मुंबई : मध्य रेल्वेची पहिली वंदे भारत सुपरफास्ट एक्स्प्रेस मुंबईत दाखल झाल्यानंतर आता घाट विभागात चाचणी सुरु करण्यात आली आहेत. तर, दुसरी वंदे भारत ७ ते ८ फेब्रुवारीपर्यंत मध्य रेल्वेचा ताफ्यात दाखल होणार आहे.

सीएसएमटी- साईनगर शिर्डी आणि सीएसएमटी - सोलापूर या दोन वंदे भारत सुपरफास्ट एक्स्प्रेसला १० फेब्रुवारी २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी हिरवा झेंडा दाखवून उदघाटन करणार आहे. बहुप्रतीक्षित असलेली वंदे भारत सुपरफास्ट एक्स्प्रेस मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर गुरुवारी रात्री दाखल झाली आहे.

हेलिकॉप्टर कारखान्याचे लोकार्पण

नवी दिल्ली : भारतातील सर्वात मोठ्या हेलिकॉप्टर कारखान्याचे लोकार्पण सोमवारी (६ फेब्रुवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कर्नाटकातील तुमाकुरू येथे हिंदुस्थान एरोनॉटीकल्स लिमिटेड हा ग्रीनफिल्ड हेलिकॉप्टर कारखाना आहे. यामुळे हेलिकॉप्टर उत्पादन क्षमता आणि इको-सिस्टम वाढवण्यास मदत होईल. पुढील २० वर्षांत येथे ४ लाख कोटींची उलाढाल असलेले १००० हून अधिक हेलिकॉप्टर बनवले जाणार आहेत. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि संरक्षण मंत्रातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहतील. हा प्रकल्प ६१५ एकर परिसरात पसरला आहे. या कारखान्यामुळे आत्मनिर्भर भारत मोहिमेला चालना मिळेल. तसेच, यामुळे हजारो नागरिकांना रोजगारही मिळेल.

पेण :आज राजकीय भूकंप?

काँग्रेस, राष्ट्रवादीचे, भाजप नेते शिवबंधन बांधणार

। पेण । प्रतिनिधी ।

आगामी काळात होणाऱ्या पेण नगरपालिका आणि पेण अर्बन बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पेणमधील राजकीय वातावरण तापू लागले आहे. याचाच एक भाग म्हणून सोमवारी (६ फेब्रुवारी) तालुक्यातील काँग्रेस, राष्ट्रवादी आणि भाजपमधील प्रमुख नेतेमंडळी ठाकरे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे विश्वसनीय वृत्त कृषीवलला प्राप्त झालेले आहे.

पेण अर्बन बँक प्रकरण

पेण नगरपालिकेची निवडणूक केव्हा ही जाहीर होईल. परंतु, अनेक हवशे नवशे इच्छुक उमेदवार निवडणूक रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे त्यांनी पेण येथील पेण अर्बन बँकेच्या आर्थिक घोटाळ्यातील मुख्य आरोपी शिशिर धारकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवण्याचे ठरवले आहे. जर निवडणूक लढवायची असेल तर उमेदवारांना कोणत्या तरी राजकीय पक्षाची कवचकुंडले बरोबर असणे गरजेचे आहे. त्यासाठी धारकर यांनी सेवानिवृत्त मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी जीवन पाटील यांची मदत घेऊन शिवसेना नेते ॲड. अनिल परब यांच्याशी संधान बांधून आपल्या समर्थकांना शिवबंधन बांधण्यासाठी प्रवृत्त केले.

त्याचीच प्रचिती सोमवारी येणार आहे. पेणमध्ये आजी-माजी नगरसेवकांचा पक्ष प्रवेशांचा कार्यक्रम होणार आहे. मात्र, कार्यक्रमाला गर्दी जमा करता येईल की नाही याबाबत साशंकता असल्याने कार्यक्रम बंदिस्त हॉलमध्ये होणार आहे. या पक्ष प्रवेशामध्ये भाजपच्या आमदारांचे निकटवर्तीय तथा राष्ट्रवादीचे नगरसेवकांचा समावेश आहे. आता •> पान २ वर

पोटनिवडणूक बिनविरोध अशक्य

अजित पवार यांचे सुतोवाच

। पुणे । प्रतिनिधी ।

विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने बाजी मारली. आता पुण्यातील कसबा आणि चिंचवड या विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. या दोन्ही जागांवरील निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी भाजपा तसेच शिंदे गटाकडून प्रयत्न केला जात आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांशी याबाबत चर्चादेखील केली आहे. दरम्यान यावेळी पोटनिवडणूक बिनविरोध होण्याचे कारण नाही. लोकशाही आहे, असे विरोधी पक्षनेते अजित पवार स्पष्टपणे म्हणाले आहेत. ते माध्यम प्रतिनिधींशी पुण्यात बोलत होते.

ही पोटनिवडणूक बिनविरोध होण्याचे काही •> पान २ वर

मुख्यमंत्र्यांचे आवाहन

। मुंबई । प्रतिनिधी ।

कसबा पेठ आणि चिंचवड या जागांवरील पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी एकनाथ शिंदे यांच्याकडून प्रयत्न केले जात आहे. त्यांनी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांशी याबाबत बातचित केली आहे. अनेक ठिकाणी आमदारांचे निधन होते. त्यानंतर त्या जागेवरील पोटनिवडणुकीमध्ये विरोधक आपला उमेदवार उभा करत नाहीत. तेथील निवडणूक बिनविरोध केली जाते. तशी परंपरा आहे. अंधेरीमध्येही नुकतेच पोटनिवडणूक झाली. त्या निवडणुकीसाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन दिले होते. त्यांच्या या आवाहनाला आम्ही प्रतिसाद दिला होता. त्यानंतर अंधेरी येथील निवडणूक बिनविरोध झाली होती. हीच परंपर सर्वांनी जपावी म्हणूनच मी विनंती करतो असे ते म्हणाले.

वेधक

विनोद कांबळीची पत्नीला मारहाण

मुंबई- भारताचे माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांच्याकडून मारहाण तसेच शिवीगाळ केल्याची तक्रार कांबळी यांच्या पत्नी अँड्रिया यांनी वांद्रे पोलीस ठाण्यात केली आहे. पोलिसांनीही कांबळी यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दाखल तक्रारीनुसार वांद्रे पोलिसांनी कांबळी यांच्याविरोधात भारतीय दंडविधानातील ३२४, ५०४ या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. विनोद कांबळी यांनी कुकिंग पॅन फेकून मारल्याचा आरोप त्यांच्या पत्नीने केला आहे. या घटनेत अँड्रिया यांच्या डोक्याला जखम झाली आहे. दारुच्या नशेत कांबळी यांनी हे कृत्य केल्याचा दावा केला जातोय. मद्यप्राशन करून त्यांच्या वांद्रे येथील फ्लॅटमध्ये हा प्रकार घडला. हे प्रकरण मिटल्याचेही कांबळी यांच्या पत्नीने सांगितले आहे.

चीनी ॲप्सवर भारताची बंदी

नवी दिल्ली : भारत सरकारने चीनविरोधात मोठी कारवाई केलीये. कर्ज आणि सट्टेबाजीसाठी वापरल्या जाणाऱ्या चीनशी संबंधित अनेक ॲप्सवर सरकारनं बंदी घालण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.. गृह मंत्रालयाच्या शिफारसीनुसार ही कारवाई सुरू केलीये. सरकार १३८ सट्टेबाजी आणि ९४ लोन ॲप्सवर तात्काळ आणि आपत्कालीन आधारावर बंदी घालणार आहे. या ॲप्समध्ये भारताच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला हानी पोहोचवणाऱ्या सामग्रीचा समावेश असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

परवेज मुशर्रफ यांचे निधन

। इस्लामाबाद । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानचे माजी लष्करप्रमुख परवेज मुशर्रफ यांचे निधन झाल्याचे वृत्त समोर येत आहे. २००१ ते २००८ या काळात पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून त्यांनी काम पाहिले होते. तसेच त्यानंतर पाकिस्तानचे पंतप्रधान म्हणून त्यांनी काम केले होते. २०१६ पासून ते दुबई येथे स्थायिक झाले होते. त्यांच्यावर प्राणघातक हल्ले झाल्यामुळे त्यांना पाकिस्तान सोडावे लागले होते. दुबईमधील रुग्णालयात त्यांचे निधन झाले असल्याची बातमी पाकिस्तानी माध्यमांच्या हवाल्याने समोर येत आहे. गेले अनेक दिवस दुबईमधील रुग्णालयात ते उपचार घेत होते. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असताना परवेज मुशर्रफ यांनी कारगिल युद्धाची आगळीक केली होती. भारतीय सैनिकांनी कारगिल युद्धात असीम शौर्य दाखवले होते. तर याच युद्धाला मुशर्रफ यांचे कट कारस्थान म्हणून ओळखले जाते.

कर्जतमध्ये रायगड जिल्हा बँकेच्या शाखेला आग

। कर्जत । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेला रविवारी (५ फेब्रुवारी) पहाटेच्या सुमारास आग लागली. बँकेतील कागदपत्रे, संगणक, फर्निचर आदी साहित्य या आगीत जळून खाक झाले आहे. कर्जत नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली.

लोकमान्य टिळक चौकात असलेल्या श्री कपालेश्वर मंदिरा वरील पहिल्या मजल्यावर असलेल्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेला आग लागली. या घटनेची माहिती समजताच अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र पाणी संपल्याने आग विझविण्यात व्यत्यय आला. अग्निशमन दलाची गाडी पाणी भरण्यासाठी पुन्हा गेली. त्या दरम्यान सहाच्या सुमारास खोपोली नगरपरिषदेची अग्निशमन दलाची गाडी आली. परंतु त्यामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ती सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर थोड्याच वेळात पाणी भरण्यासाठी गेलेली कर्जत नगरपरिषदेची अग्निशमन दलाची गाडी आली आणि जवानांनी आग विझविली.

बँकेत आग लागल्याचे माहिती मिळताच कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सतिश शिंदे,पोलीस हवालदार प्रविण लोखंडे, पोलीस शिपाई गजानन केंद्रे, भरत पावरा, श्री कपालेश्वर मंदिराचे ट्रस्टी अभिजित मराठे, प्रशांत कारूळकर, महेंद्र बोडके, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे निलेश परदेशी, सदानंद जोशी, विवेक भागवत हे घटनास्थळी पोहचले. अभिजित मराठे, निलेश परदेशी अन्य उपस्थित नागरिक यांनी आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करत होते, यावेळी बँकेचे माजी संचालक विलास थोरवे, संचालक राजेंद्र हजारे, कर्मचारी शाखाधिकारी संगीता भोईर, प्रमोद कुळकर्णी आणि •> पान २ वर

साहित्य संमेलन समारोपात सुरक्षेचा चपळगावकरांनाही फटका

। वर्धा । प्रतिनिधी ।

साहित्य संमेलनाच्या समारोपाच्या दिवशी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमेलनात हजेरी लावली होती. मात्र, त्यांच्या सुरक्षेसाठी यंत्रणेने केलेल्या तपासणीच्या अतिरेकाने चक्क संमेलनाध्यक्ष न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर हेच व्यासपीठावर येऊ शकले नाहीत. चपळगावकर यांच्या कन्या भक्ती चपळगावकर यांनी पोलिसांना विनंती करूनही त्यांनी गाडी मुख्य मांडवापर्यंत येऊ दिली नाही. पर्यायाने या कार्यक्रमापासून •> पान २ वर

आज धीर संपला

गेली दोन दिवस सरकारी सुरक्षा व्यवस्थेमुळे माझ्या ८५ वर्षांच्या बाबांना आणि त्यांच्या ८८ वर्षांच्या मित्राला डॉ. सुधीर रसाळ यांना वेळोवेळी अडवण्यात आले. मुख्यमंत्री आले तेंव्हा ९०० पोलिस होते, उपमुख्यमंत्री येणार म्हणून होते. मी प्रत्येकवेळी पोलिसांना समजावून, विनंती करून, ओरडून मार्ग काढला. आज धीर संपला आणि पोलिसांना ओरडले, चालणार नाहीत ते. चालू शकणार नाहीत एवढे अंतर. बिचारे पोलीस •> पान २ वर

तक्रार करणाऱ्या महिलेला धडा शिकविण्यासाठी

विषप्राशनाने आत्महत्येचा प्रयत्न

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ जवळील शेलू गाव परिसरातील बांधिवली येथील ३९ वर्षीय महिलेणे आपल्याविरुद्ध फिर्याद दिलेली असल्याने आरोपी असलेल्या ३८ वर्षीय व्यक्तीने त्या महिलेला धडा शिकविण्यासाठी नेरळ पोलीस ठाण्यात विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पोलीस ठाण्यात आणून बसविले असता बाथरूमला जाण्याच्या इराद्याने बाथरूममध्ये जाऊन सोबत आणलेली विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न नेरळ पोलिसांच्या खबरदारीमुळे अयशस्वी ठरला.

बांधिवली परिसरात ३८ वर्षीय दिलीप श्रीराम यादव हा त्रास देत असल्याची तक्रार एका महिलेने पोलिसात केली. त्याची दखल घेत नेरळ पोलीस हे शेलू येथे जाऊन दिलप यादव याला घेऊन नेरळ पोलीस ठाणे मध्ये पोहचले. तेथे समज देण्यासाठी कागदपत्र तयार केली जात असताना आपल्याविरुद्ध पोलिसात तक्रार देणाऱ्या महिलेला धडा शिकविण्यासाठी दिलीप यादव याने प्लॅन केला. त्याने आपल्यासोबत विष असलेली बाटली आणली होती आणि बाथरूममध्ये जाऊन ते विष प्राशन करण्यासाठी बाथरूम ला जाण्याचा बहाणा केला.त्यानंतर बाथरूम मध्ये विष प्राशन करून बाहेर आलेला ३८ वर्षीय तरुण खाली पडल्यानंतर हा प्रकार पोलिसांच्या लक्षात आला.

पोलिसांनी तात्काळ त्या तरुणाला उचलून नेरळ गावातील धन्वंतरी रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर तेथे प्राथमिक उपचार करून विष •> पान २ वर

महामार्गावरील अचानक बदलांमुळे अपघात

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर गेल्या काही वर्षांमध्ये चौपदरीकरणाचा कामामुळे अचानक कोणतीही पूर्वसूचना न देता झालेल्या बदलांमुळे तसेच बदलांसंदर्भात किमान २०० मीटर आधी तशा आशयाचे फलक न लावल्याने गाफिल राहिलेल्या वाहनचालकांकडून अपघात होत असल्याचे उघडकीस आले आहे. पोलादपूर ते महाडदरम्यान या प्रकारचे अपघात वारंवार घडल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर ते महाड दरम्यान चांढवे येथील नियोजित पेट्रोलपंपालगत गेल्या आठवडयात झालेल्या मोटारसायकल स्वार करण वाडकर याचा अचानक समोर आलेल्या रस्ताबंद करण्यासाठीच्या बॅरिकेटससाठीचा पत्रा आणि पिंपावर मोटारसायकलची धडक बसून मृत्यू झाला आहे. अशाप्रकारच्या अपघातांचे सातत्य वीर ते कशेडी घाटापर्यंत नेहमीच राहिले असून किरकोळ जखमी झालेल्या वाहनचालकांनी पोलीस ठाणे आणि सरकारी रूग्णालयाकडे धाव न घेतल्याने अपघातांची नोंद झालेली दिसून येत नाही.

शहराच्या पूर्वेकडील सर्व्हिसरोडवरून एस.टी.स्थानक आणि महाबळेश्वर रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांना गेल्या चार दिवसांपासून या सर्व्हिसरोडच्या प्रारंभीच अचानक कोणताही सूचनाफलकन लावता डांबरीगतिरोधकउभारल्याने जोरकाझटका बसून मोटारसायकलस्वार पलटी झाल्याचे तसेच वाहनांमधील प्रवासी उंच उडाल्याने त्यांच्या मस्तकावर •> पान २ वर

रिफायनरी होणारच-उपमुख्यमंत्री

। मालवण । दिलीप जाधव ।

नवसाला पावणाऱ्या आई भराड़ी देवीच्या उत्सवाच्या निमित्ताने आंगनेवाडीमध्ये सत्ताधारी भाजप आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या नेत्यांनी उत्सव साजरा केला.मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने नारळ फोडण्यात आला. तळकोकणवासियांनी प्रदुषणवाढीचा धसका घेतलेल्ल्या रिफायनरीला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ग्रीन सिग्नल दिल्यामुळे आता महाविकास आघाडी विरुद्ध भाजप असे धुमशान सुरु होणार असं दिसतेय .

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ग्रीन रिफायनरी च्या माध्यमातून ३ लाख कोटी रुपयांची भारतातील सर्वात मोठी गुंतवणुक येणार आहे .मात्र शिवसेना यावर राजकारण करत आह. लोकांना भड़कविण्याचे उद्योग सुरु आहेत,असा आरोपही त्यांनी केला.

शिवसेनेचा विरोध पाहून केंद्रसरकारने ग्रीन रिफाइनरी इतर राज्यामध्ये हलविण्याचा निर्णय घेतला होता, मात्र आमचे राज्य आल्याबरोबर त्वरित केंद्र सरकारला पत्र लिहून ग्रीन रिफाइनरी कोकणातच सुरु करण्याचा आग्रह धरला आहे,असा दावाही उपमुख्यमंत्र्यांनी केला. यामुळे पुढील २० वर्षात अर्थव्यवस्था भक्कम होईल.त्याच बरोबर फाईव्ह स्टार होटेल झाल्यास परदेशी पर्यटकांचा ओघ सुरु होईल असे ते म्हणाले.

तळकोकणातील एन्रॉन, नाणार आणि आता रिफायनरीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने गुजरात ,मुंबईच्या धनिकांनी विकत घेतल्या आणि सरकारला मोठ्या किंमतीत विकल्याचा आरोप कोकणवासीय करतात प्रकल्प येऊन सुद्धा कोकणातील शिकललेल्या तरुण,तरुणीना मुंबई,दिल्ली. गुजरात मध्ये रोजगारासाठी जावे लागते असा आरोप केला जातो.असे ते म्हणाले. यावेळी नारायण राणे,आशिष शेलार आदींची भाषणे झाली. सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी काजूच्या बोंडा वर प्रक्रिया करून ईथिनोल तयार केल्यास काजू उत्पादक शेतकर्यांना आर्थिक फायदा होईल तसेच काजू च्या बोंडाला १रुपया ऐवजी ५रुपयाचा भाव दिला पाहिजे अशी मागणी केली

देशाची विचारधारा बदला- चंद्रशेखर राव

। नांदेड । प्रतिनिधी

देशातील विचारधारा बदलण्याची गरज आहे. देशातील जनतेने अनेक आमदार, मंत्री बनवले. स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी देखील अनेक भागात आज देखील वीज नाही, पाणी नाही, रस्ते नाहीत. हे पाहून फार दुःख होतंय, अशा भावना तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी व्यक्त केल्या.

नांदेड येथील जाहीर सभेत त्यांनी मोदी सरकारच्या कार्यपद्धतीवर कडाडून टीका केली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर १६ वर्षे भाजपची आणि उर्वरित काळात काँग्रेसची सत्ता होती. दोन्ही पक्षांनी देशासाठी काय केलं? देशातील या परिस्थितीला भाजप आणि काँग्रेस जबाबदार आहेत. सरकार फक्त भाषणबाजीत वेळ घालवत आहे. कोणाला अंबानी तर कोणाला अदानी पाहिजे. मेक इन इंडिया जोक इन इंडिया झाला आहे, अशी टीका राव यांनी भाजप आणि काँग्रेसवर केली आहे. नांदेडमधील जाहीर सभेत ते बोलत होते. दिवाळीचे दिवे, तिरंगा, लायटिंग, रंग हे सर्व चीनमधून येत आहे. हे सर्व भारतात कसे येत आहे? भारतात चायना बाजार कसा लागतो? भारत बाजार का लागत नाही? असा प्रश्न उपस्थित करत के. चंद्रशेखर राव यांनी हल्लाबोल केलाय. देशात सध्या फक्त मन की बात, इसकी बात, उसकी बात यावरच भाषण सुरू आहे.असे ते म्हणाले.

७१ जणांच्या संपत्तीत २८६ टक्के वाढ

देशातील खासदार झाले मालामाल

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

२००९ ते २०१९ या काळात सलग तीन वेळा खासदार झालेल्या ७१ नेत्यांच्या संपत्तीमध्ये सरासरी २८६ टक्के वाढ झाली आहे. भाजप खासदार रमेश चंदप्पा जिगाजिनागी यांच्या संपत्तीत सर्वाधिक वाढ झाली आहे. असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर)रिपोर्टमधून ही माहिती समोर आली आहे.

या अहवालासनुसार ज्या दहा खासदारांची संपत्ती सर्वाधिक वाढली त्यामध्ये भाजपच्या सहा खासदारांचा समावेश आहे. तर शिरोमणी अकाली दल, राष्ट्रवादी काँग्रेस, बीजू जनता दलाच्या एका खासराचाही यामध्ये समावेश आहे.

अपक्ष खासदारांसह ७१ खासदारांची २००९ मध्ये सरासरी संपत्ती ६.१५ कोटी रुपये इतकी होती. २०१९ मध्ये यामध्ये २८६ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यांची सरासरी संपत्ती १७.५९ कोटी रुपये झाली आहे. दरम्यान, मागील दहा वर्षात भाजपच्या खासदारांच्या संपत्तीमध्ये सरासरी ४२ पटीनं वाढ झाल्याचेही रिपोर्ट्समध्ये म्हटलेय.

खासदार बदरूद्दीन अजमल यांच्या •> पान २ वर

सुप्रिया सुळेची संपत्ती १७३ टक्क्यांनी वाढली

राष्ट्रवादी काँग्रेसच्या बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या संपत्तीमध्ये १७३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. २००९ मध्ये सुप्रिया सुळे यांची संपत्ती ५१.५३ कोटी रुपये इतकी होती. २०१९ मध्ये १७३ टक्क्यांनी वाढून १४०.८८ कोटी रुपये इतकी झाली. दहा वर्षात सुप्रिया सुळे यांच्या संपत्तीमध्ये ८९.३५ कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

६ फेब्रुवारी

१)श्री. गेनुसिंग नारायणसिंग परदेशी
रामनाथ तळ्यासमोर अलिबाग
६ फेब्रुवारी१९४०
२)श्री.कृष्णा यशवंत खराडे
सतेज बंगला, पंतनगर चेंढरे,रायगड
६ फेब्रुवारी १९४४
३)श्रीम.ज्योत्स्ना विनोद नाईक
ब्राम्हण आळी, अलिबाग
६ फेब्रुवारी १९५२
४) श्री.विश्वनाथ शिमगा भगत,
अलिबाग कोळीवाडा, अलिबाग
६ फेब्रुवारी १९५३
५) श्री.रमेश काशिनाथ पडते,
पडते वाडी, रामनाथ,अलिबाग
६ फेब्रुवारी १९५८

उरण-पनवेल खाडीपुलाची दुरुस्ती होणार

। उरण । प्रतिनिधी ।

उरण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या उरण-पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडी पुलाचे काम दोन दिवसात सुरू होणार असल्याची माहिती सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. त्यामुळे येथील बोकडविरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चार गावातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. मात्र एप्रिल २०२१ मध्ये फुंडे गावाला जोडणारा खाडी पूल कोसळून त्यात एका तरुणाचा बळी गेल्यानंतर केलेल्या तपासणीत उरण-पनवेल या मुख्य मार्गावरील खाडी पूल

ही कमकुवत असल्याने या पुलावरील जड वाहतुकीला बंदी घालण्यासाठी बसविण्यात आलेल्या हाईट गेटमुळे १० जानेवारी २०२३ ला झालेल्या टेम्पोच्या अपघातात जखमी एका महिलेचा ही मृत्यू झाला आहे. त्यानंतर सिडकोला या पुलाच्या दुरुस्तीसाठी जाग आली आहे.

उरण-पनवेल राज्य महामार्ग क्रमांक ५४ हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात आहे. असे असले तरी उरण तालुक्यातील काही विभाग सिडकोच्या नवी मुंबई शहर विकासात मोडतो. त्यामुळे या मार्गावरील फुंडे स्थानक व सिडको कार्यालयासमोरील खाडीपूल सिडकोने बांधला होता. त्यामुळे या कमकुवत पुलाची दुरुस्ती सिडकोने करावी, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे होते.

तर पुलाच्या दुरुस्तीच्या कामासाठी हा महामार्ग सिडकोकडे वर्ग करावा असे मत सिडकोचे होते या वादामुळे मागील दोन वर्षांपासून मार्गावरील एस. टी. व एन. एम. एम. टी. या दोन्ही सार्वजनिक वाहतुकीच्या सेवा बंद झाल्या आहेत. याचा फटका चार गावातील सर्वसामान्य नागरिकांना व विशेषतः विद्यार्थ्यांना बसला आहे. नादुरुस्त पुलाच्या दुरुस्तीच्या मागणीसाठी डी.वाय. एफ.आय., किसान सभा व जनवादी महिला संघटनेने सिडकोच्या द्रोणागिरी कार्यालयावर मोर्चा ही काढला होता. तर तातडीने पुलाची दुरुस्ती सुरू न केल्यास येत्या ८ फेब्रुवारी पासून सिडकोच्या विरोधात बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला होता.

> सिडकोने उरण - पनवेल मार्गावरील नादुरुस्त पूल दुरुस्तीची निविदा काढली असून येत्या दोन दिवसात पुलाच्या दुरूस्तीचे काम सुरू होईल. तसेच या दरम्यान या मार्गावरील हलकी वाहने ही सुरूच ठेवण्यात येणार आहेत. तर पुलाचे काम सहा महिन्यात पूर्ण करण्यात येणार आहे.
>
> - हनुमंत नहाने
> सिडकोचे कार्यकारी अभियंता

भरडधान्य विक्री प्रदर्शनास प्रतिसाद

|| तब्बल ११ लाख रुपयांची विक्री

। मुंबई । प्रतिनिधी ।

उच्च पोषणमूल्य व आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या अशा पौष्टिक तृणधान्यांना बळकटी देण्यासाठी मंत्रालयात महाराष्ट्र मिलेट मिशनच्या शुभारंभ प्रसंगी आयोजित भरड धान्यापासून तयार केलेल्या पदार्थांच्या प्रदर्शनास मंत्रालय अधिकारी-कर्मचारी यांनी भरभरुन प्रतिसाद दिला. दोन दिवसात तब्बल ११ लाख रुपयांच्या पदार्थांची यावेळी विक्री झाली.

मंत्रालयाच्या त्रिमूर्ती प्रांगणात भरड धान्यापासून बनवलेल्या पदार्थांच्या प्रदर्शन विक्रीसाठी स्टॉल्स लावण्यात आले होते. त्यास अधिकारी कर्मचाऱ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला. या प्रदर्शनात २८ बचत गट आणि कृषी प्रक्रिया धारक सहभागी झाले होते. त्यांनी बनवलेल्या नाचणी कुकीज, बाजरी कुकीज, नाचणी बिस्कीट, नाचणी सत्व, नाचणी लाडू, पापड, शेव, ज्वारी रोस्ट लाया, नाचणी चिवडा, नाचणी केक, बर्फी, शंकरपाळी, ज्वारीची चकली, नाचणीचे मोदक, आंबील, ज्वारी पालक वडी, मिक्स ढोकळा, भगर दहिवडे, नाचणी आप्पे आणि कचोरी, ज्वारी उपमा अशा पदार्थांची चवीने उपस्थितांना मोहविले आणि त्या पदार्थांच्या खरेदीसाठी झुंबड उडाली.

या प्रदर्शनामध्ये साधारणपणे ११ लाख रुपयांची विक्री झाली. समृद्धी ग्रो ग्रुप पुणे तात्यासाहेब फडतरे यांनी सर्वाधिक विक्री केली. या प्रदर्शनात नाचणी कुकीज, लाडू, बाजरी चिवडा, नाचणी सत्व या पदार्थांना मोठी मागणी असल्याचे दिसले.

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये स्वच्छता अभियान

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

पोलादपूर येथील ग्रामीण रूग्णालयाचा परिसर चौपदरीकरणाच्या भुसंपादन आराखड्यात असूनही अद्याप संपादित झाला नसल्याने ग्रामीण रूग्णालयाचा परिसर कम्पाऊंडवॉलसह शाबूत आहे. त्यामुळे ग्रामीण रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिष्ठाता डॉ.भाग्यरेखा पाटील आणि रूग्णालयातील डॉक्टर्स व कर्मचारीवर्ग या परिसरात वेळ मिळाल्यानंतर साफसफाई करण्यासाठी सज्ज होत असल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या परिसरातील संरक्षक भिंतीच्या आतील भागात आठ मीटरपर्यंतची जमीन भूसंपादन आराखड्यामध्ये दिसून येत आहे. मात्र, मूळमालक सूर्यकांत गरूड यांनी या भुसंपादनाच्या मोबदल्याबाबत हरकत घेतल्याने अद्याप संरक्षक भिंत फोडून आतील जमिनीचे संपादन करण्यात आले नाही. परिणामी, शहरातील पश्चिमेकडील सर्व्हिसरोडची लांबी अद्याप नियोजित लांबीच्या निम्म्यापेक्षाही कमी आहे. पश्चिमेकडील सर्व्हिसरोड उंबरकोंडच्या रस्त्यापर्यंत होण्याची नियोजित नकाशाप्रमाणे आवश्यकता असताना हा सर्व्हिसरोड अंडरपासपासून केवळ शंभर मीटर्स ग्रामीण रूग्णालयाच्या आधीच संपुष्टात आला आहे.

पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाचा परिसर या भुसंपादनामध्ये संपादित न झाल्यामुळे संरक्षक भिंतीच्या आतील भागातील जमिनीवरील कागदकचरा तसेच अन्य टाकाऊ वस्तू गोळा करून परिसराची स्वच्छता करण्यासाठी साधारणपणे पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारी डॉ. भाग्यरेखा पाटील, डॉ.राजेश सलागरे, डॉ. महाडीक तसेच परिचारिका स्वप्नाली गांधी, जाधव, मिश्रक हजवानी, पुरूष परिचारक तसेच चतुर्थ श्रेणी कामगार, आया अशा कर्मचारी वर्गाकडून हातात झाडू घेऊन नियमितपणे प्रयत्न केले जात आहेत. ग्रामीण रूग्णालयाच्या परिसरामध्ये उन्हाळयाचा त्रास होऊ नये यासाठी मातीवर पाणी फवारून धूळ उडण्यास प्रतिबंधही केला जात आहे. यामुळे पोलादपूर ग्रामीण रूग्णालयाच्या स्वच्छता मोहिमेचा आदर्श पोलादपूर तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या अन्य कार्यालयांनीही घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

हुंड्यासाठी विवाहितेचा मानसिक छळ

महाड तालुक्यातील घटना; तिघांवर गुन्हा दाखल

। महाड । प्रतिनिधी ।

माहेरहून हुंडा दिला नाही म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करीत तिला नदीमध्ये ढकलून ठार मारण्याची धमकी देणाऱ्या तिच्या पतिवर तसेच सासू व सासऱ्यावर महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाड तालुक्यातील केंबुर्ली या ठिकाणी ही घटना घडली असून पीडित महिला ही शिक्षिका आहे.

याबाबत शिक्षिका अक्सा मुईज घोले (वय २५,रा. केंबुर्ली या महाड) यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. अक्सा यांचा विवाह मुईज घोले यांच्याजवळ ४ डिसेंबर २०२१ ला झाला होता. तेव्हापासून ३० जानेवारी २०२३ पर्यंत अक्सा यांचा पती ,सासू व सासरा यांच्याकडून शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. लग्नामध्ये दागिने, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन घेण्याकरता माहेरून हुंडा दिला गेला नाही म्हणून त्यांचा शारीरिक छळ केला जात होता. याशिवाय त्यांचा पती मुईज याने तलाक तलाक तलाक असे तीन वेळा करून आपल्या पत्नीला घटस्फोट देण्याची धमकीही दिली.

तसेच अक्सा यांना मोटारसायकल वर बसवून पुलावर नेले व नदीमध्ये ढकलून ठार मारण्याची धमकी देखील दिली. हा सर्व प्रकार अक्सा यानी आपल्या तक्रारीत नमूद केला आहे. पती व सासू-सासर्यांच्या जाचाला कंटाळून अखेर अक्सा यानी महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली आहे.

त्यांच्या तक्रारीनुसार ४ फेब्रुवारीला महाड शहर पोलीस ठाण्यात मुईज फारुख घोले, फारुख अब्दुल रहमान घोले व खादीजा फारूक घोले या तिघांविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे करत आहेत.

आ. देशमुख यांना धमकी

। मुंबई । प्रतिनिधी ।

ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. अज्ञात व्यक्तीने फोन करून त्यांना ही धमकी दिली. याबाबत स्वत: नितीन देशमुख यांनी माध्यमांना माहिती दिली असून राणे कुटुंबाविरोधात बोलल्याने मला ही धमकी मिळाली, असा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे.

सकाळी ११.३० ते दुपारी १२ च्या दरम्यान मला दोन वेगवेगळ्या नंबरवरून फोन आले. त्यांनी नारायण राणे आणि नितेश राणेंचं नाव घेऊ मला जीवे मारण्याची धमकी दिली. आम्ही अनेक लोकांना मारून समुद्रात फेकून दिले आहे. त्यांचा अद्यापही पत्ता लागला नाही. तुम्ही मुंबईत आल्यानंतर तुमचाही तसाच समाचार घेऊ, अशी धमकी त्यांनी दिली असल्याची प्रतिक्रिया नितीन देशमुख यांनी दिली. पुढे बोलताना, मी मंगळवारी मुंबईला येत असून तुम्ही नारायण राणे, नितेश राणेंना घेऊन रात्री ८ ते १० दरम्यान नरीमन पॉईंटवर या असे आव्हान मी धमकी देणाऱ्याला दिले असल्याचेही त्यांनी सांगितले.

पहिल्या अर्थसंकल्पासाठी फडणवीसांनी सूचना मागविल्या

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राचा अर्थसंकल्प कसा असावा, यासाठी उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट जनतेतून सूचना आणि संकल्पना मागविल्या आहेत. २७ फेब्रुवारीपासून राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन मुंबईत होणार असून, लवकरच कामकाज सल्लागार समितीत अर्थसंकल्पीय कामकाजाचे वेळापत्रक ठरेल.

महाराष्ट्रात आता अर्थसंकल्पाची तयारी सुरू झाली आहे. जिल्हाश: डीपीसी आणि विभागश: वार्षिक आराखड्यासाठी बैठकी पूर्ण झालेल्या आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आतापर्यंत मुख्यमंत्री, गृहमंत्री, विरोधी पक्षनेता, उपमुख्यमंत्री अशी अनेक पदे भूषविली.

पण, अर्थमंत्री म्हणून त्यांचा हा पहिला अर्थसंकल्प असणार आहे.

अर्थसंकल्प कसा वाचावा हे पुस्तक त्यांनी आमदार असतानाच लिहिले आहे. अर्थसंकल्पावर अनेक व्याख्याने सुद्धा त्यांनी दिली आहेत. कालही केंद्रीय अर्थसंकल्पावर त्यांचे मुंबईत व्याख्यान झाले. यंदाच्या आणि आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात जनतेच्या सूचनांचे, संकल्पनांचे प्रतिबिंब असावे, म्हणून त्यांनी थेट जनतेतून सूचना, संकल्पना मागविल्या आहेत. http://bit.ly/MahaBudget 23 या संकेतस्थळावर जाऊन लोकांना आपल्या संकल्पना मांडता येणार आहेत. त्यामुळेच निश्चित जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब राज्याच्या आगामी अर्थसंकल्पात असणार आहे असे अर्थमंत्र्यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील बेरोजगारी वाढलेलीच

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

देशातील बेरोजगारीचा दर जानेवारी महिन्यात घसरला आहे.मागच्या चार महिन्याती हा सर्वात कमी दर आहे. आर्थिक निगरानी संस्थेने ही माहिती दिली आहे. मात्र गुजरातपेक्षा महाराष्ट्रातील बेरोजगारी अद्यापही वाढलेली असल्याचे एका पाहणी अहवालातून स्पष्ट झालेले आहे.

वाढत्या बेरोजगारीवरुन विरोधक केंद्र सरकारवर टीका करत आले आहेत. याआधी देखील सीएमआयईच्या आकडेवारीवरुनसरकारला धारेवर धरण्यात आले होते. वर्ष २०२२ मध्ये ऑगस्ट आणि डिसेंबरमध्ये बेरोजगारीच्या दराने उच्चांक गाठला होता. आता वर्षाच्या पहिल्या महिन्यातच बेरोजगारीचा दर कमी झाल्यामुळे मोदी सरकारची वर्षाची सुरुवात चांगली झाल्याचे बोलले जात आहे.

बिगर शासकीय संस्था असलेल्या सीएमआयईने दिलेल्या माहितीनुसार जानेवारी २०२३ महिन्यातला महागाईचा दर ७.१४ टक्क्यांवर आला आहे. याच्याआधी डिसेंबर २०२२ मध्ये बेरोजगारीचा दर ८.३० टक्के एवढा होता.

सीएमआयईच्या आकडेवारीनुसार जानेवारी महिन्यातला बेरोजगारीचा दर ८.५५ टक्के आहे, तर ग्रामीण भागातील बेरोजगारी ६.४३ टक्के आहे. तर सीआयईएल एचआर सर्विसेसचे व्यवस्थापकीय संचालक आदित्य मिश्रा म्हणाले की, गेल्या तीन महिन्यांच्या तुलनेत जानेवारीमध्ये बेरोजगारीचा दर कमी राहिला ही आनंदाची बाब आहे. तसेच वर्षाची

औद्योगिक गुंतवणुकीला प्रोत्साहन देणारा मैत्री कायदा-- उद्योगमंत्री

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायदा, २०२२ या विधेयकामुळे गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल आणि मैत्री कक्षाला वैधानिक दर्जा मिळाल्याने उद्योगासाठी लागणाऱ्या परवानग्या सुलभ आणि अधिक वेगवान होतील, असा विश्वास उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला.

मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायदा, २०२२ या विधेयकाच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली आहे. या विधेयकामध्ये उद्योगांसाठीच्या परवानग्या सुलभ आणि अधिक वेगवान करणे, त्याबाबत यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्याच्या तरतुदी आहेत. महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री) विधेयक विधिमंडळात सादर करण्यास मंत्रीमंडळाची मान्यता मिळाली आहे.

गुंतवणुकीला प्रोत्साहन, औद्योगिक सुविधा, व्यवसाय सुलभीकरण व उद्योगांसाठी आवश्यक परवानग्या / मंजुरी आणि सेवा कालमर्यादेत देण्याच्या दृष्टिने कायद्याद्वारे गुंतवणूकदार सुविधा केंद्र/ गुंतवणूक प्रोत्साहन एजन्सी म्हणून एक खिडकी प्रणालीला अधिकार देण्यासाठी उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) कायदा, २०२२ आणला जाणार आहे. पर्यवेक्षकीय समिती- प्रधान सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात येईल. ही समिती धोरणात्मक शिफारशींसह विलंब झालेल्या प्रकरणामध्ये शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यास सक्षम राहील.

पान १ वरून

पेण : आज राजकीय भूकंप?

कार्यक्रमासाठी किती गर्दी होते यावरून पक्षप्रवेश दणक्यात झाला की फुसकाबार निघाला हे सोमवारी दिसून येईल. परंतु महत्वाची बाब म्हणजे आजपर्यंत राजकीय पक्षाचा प्रवेश पाहिल्यास नेते मंडळी टुणकण उडी मारुन या पक्षातून त्या पक्षात जात असतात आणि त्यांची शेपूट पकडून कार्यकर्ते मागे मागे जात असतात. मात्र, इथे आपल्याला प्रमुख नेते मंडळी पडद्याच्या आड असल्याचे वाटत आहेत. अथवा राजकीय पक्षामध्ये या नेते मंडळींना स्थान नाही. असे म्हटल्यास वावग ठरणार नाही. हा फक्त हवशे नवशे उमेदवारी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रवेश आहे. त्यामुळे सेनेचा हा जाहीर प्रवेश उल्लेखनीय व आठवणीत राहण्यासारखा आहे. हा पक्ष प्रवेश कसा ही झाला तरी याचा फटका भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस मोठा बसणार आहे. या पक्ष प्रवेशामध्ये शेकाप वगळता इतर सर्वच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते पहायला मिळणार आहेत एवढे निश्चित.

अजित पवार यांचे सुतोवाच

कारण नाही. त्यांनी कोल्हापूर, पंढरपूर, देगलूर येथील पोटनिवडणूक बिनविरोध होऊ दिली नव्हती. मुंबई येथील अंधेरी पोटनिवडणुकीसाठी आपला उमेदवार दिला नाही, म्हणजे बाकीच्या सर्व निवडणुका बिनविरोध होतील हे त्यांनी डोक्यातून काढावं. शेवटी लोकशाही आहे. जनता ज्यांना निवडून द्यायचे, त्यांना निवडून देईल, असे अजित पवार म्हणाले आहेत.

रायगड जिल्हा बँकेच्या शाखेला आग

अन्य कर्मचारी या ठिकाणी पोहचले.नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेवक बळवंत घुमरे, विवेक दांडेकर यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. या आगीत बँकेतील कागदपत्रे, संगणक, फर्निचर व अन्य साहित्य जळून खाक झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती बँकेत शिक्षक कर्मचारी, शेतकरी, सहकारी संस्था यांची खाती मोठया प्रमाणात आहे, खातेदारांची कोणत्याच प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून सोमवारपासून मारुती मंदिराच्या इमारतीमध्ये बँक चालू करण्यात येईल अशी माहिती बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कमलाकर वाघमोडे यांनी दिली.

साहित्य संमेलन समारोपात सुरक्षेचा चपळगावकरांनाही फटका

दूर राहणेच चपळगावकर यांनी पसंत केले.संमेलनाच्या उद्घाटन सत्रात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भाषणावेळी विदर्भवाद्यांनी वेगळ्या विदर्भाच्या मागणीसाठी निदर्शने केली होती. या गोंधळाचा परिणाम मुख्यमंत्र्यांच्या भाषणावर आणि उद्घाटन सत्रावर झाला होता.रविवारी फडणवीस यांच्या कार्यक्रमात या गोंधळाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सुरक्षा यंत्रणा प्रचंड सतर्क झाली होती. संमेलन नगरीत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची प्रवेशद्वारावर कसून तपासणी केली जात होती. याचा फटका ८५ वर्षांच्या संमेलनाध्यक्षांनाही बसला.

आज धीर संपला

आदेशाचे पालन करत होते. ते बावचळले आणि जा म्हणाले. बाबांना काहीही फरक पडला नाही. गाडी शेवटी ग्रंथ प्रदर्शनाकडे वळली अशी बोलकी प्रतिक्रिया भक्ती चपळगावकर यांनी समाज माध्यमांवर व्यक्त केली आहे.

देशातील खासदार झाले मालामाल

संपत्तीमध्ये १६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. अकाली दलच्या खासदार हरसिमरत कौर बादल यांच्या संपत्तीत २६१ टक्क्यांनी वाढ झाल्याचं रिपोर्ट्समधून समोर आले आहे. वरुण गांधींच्या संपत्ती ५ कोटींवरुन ६० कोटी झाली २००९ मध्ये मेनका गांधी यांची संपत्ती १७ कोटी रुपये होती, जी २०१९ मध्ये ५५ कोटी रुपये इतकी झाली.

लागोपाठ तीन वेळा खासदार झालेल्या नेत्यांमध्ये भाजपच्या सर्वाधिक नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये भाजपचे ४३ खासदार आहे. दहा वर्षात भाजपच्या या खासदारांची संपत्ती सरासरी १५ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. २००९ मध्ये त्यांचं सरासरी उत्पन्न चार कोटी होतं. जे २०१९ मध्ये २० कोटी रुपये इतकं झालं आहे. काँग्रेसच्या दहा खासरारांची संपत्ती सरासरी १० कोटी रुपयांनी वाढली आहे. २००९ मध्ये काँग्रेसच्या खासरांची सरासरी संपत्ती पाच कोटी रुपये होती.. जी २०१९ मध्ये १६ कोटी रुपये इतकी झाली आहे. तृणमूल काँग्रेस या पक्षाचा तिसरा क्रमांक लागतो... ७१ पैकी तृणमूल काँग्रेसचे सात खासदार आहेत. २००९ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या खासदारांची सरासरी संपत्त ७६ लाख रुपये होती. जी २०१९ मध्ये ५.९ कोटी रुपये इतकी झाली आहे. शिवसेना आणि बीजद यांचे प्रत्येकी दोन दोन खासदार आहेत.

विषप्राशनाने आत्महत्येचा प्रयत्न

प्राशन केलेल्या यादव ची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने त्याला उल्हासनगर येथील सिव्हिल हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी नेले. मात्र तेथे देखील प्रकृतीमध्ये सुधारणा होत नसल्याने शेवटी मुंबई येथील सायन हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी नेले.त्यानंतर त्याची तब्बेत सुधारल्यानंतर नेरळ पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बी टी धायगुडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक राजेंद्र तेंडुलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हनुमंत शिंदे हे अधिक तपास करीत आहेत.

महामार्गावरील अचानक बदलांमुळे अपघात

आघात झाल्याचे अपघात अनेक प्रत्यक्षदशाअनी पाहिले आहेत. याच सर्व्हिसरोडलगत मुंबईकडून गोव्याकडे जाणाऱ्या महामार्गाचा पोलादपूर शहरातील अंडरपास मार्ग सुरू होत असून या अंडरपासमध्ये जाणाऱ्या वाहनांना सर्व्हिसरोडवरून जाणारी वाहने अगदी समोरासमोर येत असल्याने या गतिरोधकामुळे सर्व्हिसरोडवरील वाहनांच्या गतिला खीळ बसण्याचा हेतू असला तरी तो गतिरोधक अचानक कोणतीही पूर्वसूचना अथवा फलक न लावता उभारल्याने अपघातांना निमंत्रण देणारा ठरला आहे. एलएंडटी या ठेकेदार कंपनीने हा पत्रा आणि पिंप उभे करून रस्ता बंद केल्याची पूर्वसूचना देणारे फलक दोनशे मीटर अंतरावर आधी न लावल्याने हा अपघात झाल्याचे दिसून येत आहे.मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सुमारे ३२८ ठिकाणी डायव्हर्शन, मेन ऍट वर्क, स्पीडब्रेकर, वर्क इन प्रोग्रेस, वानसाईड क्लोज्ड, ब्लिंकर्स, अशाप्रकारच्या वाहतुकीच्या निर्देशांचा अभाव असल्याचे खुद्द रायगड वाहतूक पोलीसांनीही सांगितले असून महामार्गावरील बांधकाम ठेकेदारांकडून केल्या जाणाऱ्या अचानक बदलांची कल्पनाही वाहतुक पोलीसांसह वाहनचालकांना येत नसल्याने दिवसेंदिवस किरकोळ व गंभीर स्वरूपांच्या अपघातांची संख्या वाढीस लागली असल्याचे दिसून येत आहे.

पुण्यातील पोटनिवडणुका बिनविरोध करा -राज ठाकरे

। मुंबई । प्रतिनिधी ।

पिंपरी चिंचवड-कसबा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी रविवारी (५ फेब्रुवारी) सर्वपक्षीय नेत्यांना पत्र लिहून आवाहन केलं आहे. मी अगदी सुरुवातीपासून या मताचा आहे की, जेव्हा एखाद्या विद्यमान लोकप्रतिनिधीचं निधन होतं तेव्हा तिथे होणारी पोटनिवडणूक शक्यतो बिनविरोध करावी, असं मत राज ठाकरेंनी व्यक्त केलं.

राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्र विधानसभेच्या २ आमदारांचं नुकतंच दु:खद निधन झालं. या निधनामुळे रिक्त झालेल्या विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिडणुका होत आहेत. मी अगदी सुरुवातीपासून या मताचा आहे की, जेव्हा एखाद्या विद्यमान लोकप्रतिनिधीचं निधन होतं तेव्हा तिथे होणारी पोटनिवडणूक शक्यतो बिनविरोध करावी. कारण मुळात जसा त्या विधानसभेतील कौल लोकप्रतिनिधीला असतो, तसाच कौल त्याच्या पक्षालादेखील असतो.

अनेकदा त्या पोटनिवडणुकीत उमेदवार हा मृत व्यक्तीच्या घरातील असतो. अशावेळेस पक्षाने जर मृत व्यक्तीच्या घरातील उमेदवार दिला असेल तर, त्या उमेदवाराला बिनविरोध निवडून देणं ही एक प्रकारे, राजकीय संस्कृतीने त्या निधन झालेल्या व्यक्तीला श्रद्धांजलीच ठरणार नाही का? ही प्रगल्भता महाराष्ट्राच्या राजकारणाला नवीन नाही, असं मत राज ठाकरेंनी व्यक्त केलं.

राज ठाकरे पुढे म्हणाले, अर्थात उमेदवार जर निधन पावलेल्या लोकप्रतिनिधीच्या घरातील नसेल तर, जनता देखील सहानभूती दाखवेलच असं नाही. अंधेरी पूर्व विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या वेळेस, दिवंगत आमदार रमेश लटके यांच्या पत्नी शिवसेनेच्या तिकिटावर उभ्या होत्या. त्यावेळेस मी देवेंद्र फडणवीस यांना निवडणूक बिनविरोध करण्याचं आवाहन केलं होतं. ज्याला सकारात्मक प्रतिसाद देत, त्यांनी ती निवडणूक बिनविरोध होऊ दिली.

आता पुन्हा पिंपरी-चिंचवड आणि कसबा विधानसभांमध्ये पोटनिवडणूका होत आहेत. जो उमदेपणा भारतीय जनता पक्षाने दाखवला तोच उमदेपणा महाविकास आघाडीच्या नेत्यांनीही दाखवावा. महाराष्ट्राची राजकीय संस्कृती प्रगल्भ आहे हे देशाला दाखवून देण्याची संधी आपल्याला सर्वांना आहे. हीच नाही तर एकूणच अशा दु: खद घटनांमुळे होणाऱ्या पोटनिवडणुका बिनविरोध कराव्यात ही इच्छा, असंही राज ठाकरेंनी नमूद केलं.

निवडक

तळा येथे रोहिदास जयंती

तळा : तळा शहरात संत रोहिदास महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रोहिदास नगर येथे संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच गावातील ज्येष्ठ नागरिकांकडून रोहिदास नगर प्रवेशद्वाराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी चर्मकार विकास संघाच्या पदाधिकाऱ्यांचे रोहिदास ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

नांदगाव : विधवांचा सन्मान

मुरुड : नांदगावच्या सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षिका रजनी प्रकाश जोशी यांच्या माध्यमातून विधवा स्त्रियांसाठी हळदीकुंकू समारंभाचा एक नाविन्यपूर्ण कार्यक्रम नुकताच माळी समाज हॉलमध्ये साजरा करण्यात आला. ईशांत पटेल, अर्णव सोनार यांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी विद्याधर चोरघे, स्मीता खेडेकर विनोद दळवी, सुगंधा दळवी उपस्थित होते. डॉ.ज्योती पटेल यांनी प्रास्ताविक केले. २०० महिला यावेळी उपस्थित होत्या.

रानवली येथे अभिवादन

श्रीवर्धन : रानवली येथे श्री संत रोहिदास जयंती उत्सव चर्मकार समाजाचे वतीने मोठ्या भक्तीमय वातावरणात व उत्साहाने संपन्न झाला. यावेळी रानवलीचे सरपंच सुरेश गो.मांडवकर, राजू जाधव, विठ्ठल धामणकर, शाम धामणकर, प्रितम श्रीवर्धनकर, मुकुंदराज श्रीवर्धनकर, प्रमोद गोरेगावकर, समीर वालवटकर, राजेंद्र शिवतरकर आदि मान्यवर उपस्थित होते. यानिमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

खोपोलीत रक्तदान शिबीर

खोपोली : संत निरंकारी चॅरीटेबल फाउंडेशन झोन शाखा-खोपोली, सावरोली, मार्केवाडी, तिवरे यांच्या वतीने रविवारी १२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत खोपोली येथील संत निरंकारी सत्संग भवन वासंरग खोपोली या ठिकाणी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर रक्तदान शिबिरामध्ये रक्तसंकलन शासकीय रक्तपेढी आलिबाग-रायगड यांच्यामार्फत होणार आहे.

थंडीत चढउतार सुरु

महाड : महाड शहर आणि परिसरात गेल्या आठवड्यापासून थंडीत कमालीचा चढउतार सुरु झाला आहे. मध्येच थंडी गायब झालेली असते आणि उष्मा जाणवू लागतो. याचा परिणाम आरोग्यावर होऊ लागला असून, अनेकांना सर्दी, खोकला, तापासारख्या साथीच्या आजारांचा त्रास जाणवू लागला आहे.दरम्यान,पहाटेच्यावेळी मॉर्निंग वॉक घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय वाढत असल्याचे जाणवत आहे.

पनवेल मनपाच्या कामात

सिडकोचा हस्तक्षेप

। पनवेल । प्रतिनिधी ।

शहरातील सार्वजनिक सेवासुविधांच्या जबाबदारीचे हस्तांतरण होण्यापूर्वीच त्यांची जबाबदारी महापालिकेवर ढकलणाऱ्या सिडको प्रशासनाने हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही महापालिकेच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा आरोप होत आहे. खारघरमध्ये विकासाचे अधिकार सिडकोकडे आहेत. मात्र येथे पनवेल महापालिकेच्या मालकीच्या असलेल्या मलनि:सारण वाहिन्यांच्या संदर्भातील ड्रेनेज कनेक्शन सर्टिफिकेट विकासकाला परस्पर सिडकोकडून दिले जात आहे. हा प्रकार महापालिकेच्या अधिकारांवर अतिक्रमण करण्यासारखा असल्याचे महापालिकेच्या बांधकाम विभागाचे म्हणणे आहे.

पनवेल महापालिकेच्या स्थापनेवळी खारघर शहर वगळून उर्वरित भागांमध्ये महापालिकेला सर्वाधिकार देण्यात आले. नगरविकास विभागाच्या आशीर्वादाने शिल्लक विकासकामांचे कारण सांगून शहरातील विकासाचे अधिकार सिडकोने स्वत:कडे ठेवले. त्यामुळे खारघर शहरात नव्याने बांधण्यात येत असलेल्या इमारतींना बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र सिडकोकडून दिले जाते. इमारत पूर्ण झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्यासाठी अग्निशमन विभागासह इतर अनेक प्रमाणपत्रे द्यावी लागतात. त्यापैकी डीसीसी म्हणजेच ड्रेनेज कनेक्शन सर्टिफिकेट ही महत्त्वपूर्ण बाब आहे. त्याशिवाय बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र दिले जात नाही. मात्र वर्षांनुवर्षे भोगवटा प्रमाणपत्र देत असलेल्या सिडकोला अद्यापही ते देण्याचा मोह आवरता आलेला नाही. पनवेल महापालिका क्षेत्रातील खारघरसह सर्व विभागांमधील पायाभूत सोयीसुविधांचे हस्तांतरण झाले आहे. सिडकोने महापालिकेकडे मलनि:सारण वाहिन्या, रस्ते, पदपथ, पथदिवे आदी सगळ्यांचे हस्तांतरण केले आहे. सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे भुयारी गटार खोदून मलनि:सारण जोडणी देण्यासाठी सिडकोने महापालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

> ड्रेनेज कनेक्शन सर्टिफिकेट देण्याचे अधिकार आता सिडकोकडे राहिलेले नाहीत, हे सत्य आहे. हे प्रमाणपत्र सिडकोकडून दिले जात असल्याचे लक्षात आल्यानंतर सिडकोला पत्र लिहून हा प्रकार थांबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. - संजय जगताप, शहर अभियंता, पनवेल मनपा

हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होऊन अनेक महिने उलटल्यानंतरही सिडकोने महापालिकेच्या अधिकारांवर अतिक्रमण केले आहे. खारघरमध्ये अनेक विकासकांना 'ड्रेनेज कनेक्शन सर्टिफिकेट' दिले जात आहे. महापालिकेच्या बांधकाम विभागाला न कळवता तसेच, अधिकार कक्षेत नसताना सिडकोकडून डीसीसी चे वाटप केले जात आहे. सार्वजनिक सोयीसुविधांच्या हस्तांतरणापूर्वी उघडपणे सर्व जबाबदारी महापालिकेवर ढकलून सिडकोने हात वर केले होते. हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सोयीसुविधा देण्याची जबाबदारी सिडकोची असेल, अशी कबुलीही आगाऊ ताबा पावतीवर सिडकोने दिली होती, परंतु सिडकोने करारनाम्यावर मान्य केलेला शब्द पाळला नाही. नागरिक तक्रार करण्यासाठी गेले की कार्यकारी अभियंता कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी जबाबदारी झटकत होते. आता हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सिडको महापालिकेच्या अधिकारांवर का टाच आणते आहे?, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खारघरमध्ये सिडकोने चार ते पाच विकासकांच्या इमारतींना 'डीसीसी' दिले आहे. परंतु सिडकोपुढे मांजर होणारे महापालिका प्रशासन अजूनही ठाम भूमिका घेण्यास तयार नाही.

ड्रेनेज कनेक्शन प्रमाणपत्राचे परस्पर वाटप

युवकांमधील हृदयरोग,मधुमेह चिंताजनक

डॉ.तात्याराव लहाने यांचे मत

संजीवनी आरोग्य संस्थेत कलर डॉपलर,सोनोग्राफी यंत्र

। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।

अलिकडे चाळीशीतच युवकांमध्ये हृदयरोग वा मधुमेहाचे वाढते प्रमाण चिंतादायक असल्याचे मत पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी व्यक्त केले. यासाठी व्यसनाधिनतेपासून दूर रहा असे आवाहन केले.

मुरुड येथील श्रीमती अंजनाबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ केअर ॲंड वेलफेअर सेंटरमध्ये २ डी इको कलर डॉपलर, सोनोग्राफी यंत्राचे उद्घाटन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. लहाने यांनी वाढत्या व्यसनाधिनतेविषयी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. तंबाखू, सिगरेट, दारू आदी व्यसनांमुळे शरीरातील एकेक अवयव कमजोर होत असतो. मधुमेहींनी साखर वर्ज करून पिझ्झा, बर्गर, हॉटडॉग वा मांसाहार करत सारखे पदार्थ शरीराची नासाडी करतात असे त्यांनी निदर्शनास आणले. यासाठी हिरव्या पालेभाज्या व माशांचे सेवन करा, असे आवाहन केले.

संजीवनी आरोग्य केंद्राला देणगीदारांचे विशेष ऋण व्यक्त करून एका छताखाली सर्व आरोग्य सेवा देण्याचा प्रयत्न करु असे सुचित केले. यावेळी मुख्याधिकारी पंकज भुसे, उद्योजक दिलावर महाडकर, डॉ.

रागिणी पारेख, डॉ. कोकाटे, विजय सुर्वे, डॉ. विक्रमजीत पाडोळे, डॉ. के.के. मोरे, डॉ. सौरभ पाटील, डॉ. अपूर्वा पाटील, डॉ. संजय पाटील, जयंत चौलकर, माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील, किर्ती शहा, अजित गुरव, सुबोध महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक करतांना कार्याध्यक्ष विजय सुर्वे यांनी साडेपाच वर्षात संस्थेच्या उभारणीत अद्ययावत आरोग्य यंत्रणा केवळ देणगीदारांच्या मदतीने उभी राहिली याचा सार्थ अभिमान आहे. मुरुडसह श्रीवर्धन, म्हसळा या तालुक्यांतून २० रुग्णांना डायलिसीस सेवा दिली जात आहे .

याप्रसंगी उद्योजक दिलावर महाडकर यांनी सोनोग्राफी मशीन साठी पाच लाख रुपये देणगी दिल्याबद्दल डॉ. लहाने यांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. मुख्याधिकारी पंकज भुसे आपल्या भाषणात म्हणाले की, नगरपरिषद ही शहरातील नागरिकांची पालक संस्था असते. या आरोग्य संस्थेला आर्थिक हातभार लागावा म्हणून दरमहा वा प्रति वर्षीअंशदान सुरु करण्याची ग्वाही दिली.

डॉ. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली ही संस्था सर्वांच्या मदतीचा हात घेऊन संस्था वाटचाल करीत असल्याचा निर्वाळा डॉ. कोकाटे यांनी दिला. यावेळी डॉ. मोरे, डॉ. अपुर्वा पाटील, डॉ. संजय पाटील, जयंत चौलकर यांनी आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचलन रश्मी साठे यांनी तर आभार प्रदर्शन राशीद फहीम यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नितीन अंबुर्ले, जहूर कादिरी अजित गुरव, प्रमोद भायदे, आदेश दांडेकर, शशिकांत भगत, शकील कडू, अमित कवळे तसेच संजीवनी आरोग्य केंद्रातील कर्मचारी वृंदानी अथक परिश्रम घेतले.

बेलापूर- मुंबई वॉटरटॅक्सी सेवा उद्यापासून

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

बेलापूर ते मुंबई असा जलप्रवास करण्याचे नियोजन आखण्यात आले असून येत्या मंगळवार दि. ७ फेब्रुवारीपासून बेलापूर ते मुंबई वॉटर टॅक्सी प्रवास सर्वसामान्यांसाठी सुरू करण्यात येणार आहे. यासाठी दरही आता सर्वसामान्यांना परवडतील असे ठेवण्यात आलेले आहेत. यामुळे वाढत्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी ही मदत होणार आहे.

महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाकडून बेलापुरमध्ये जेट्टी

बांधून वॉटर टॅक्सीसेवा मागील वर्षी सुरू करण्यात आली होती. मात्र अधिक भाडे असल्याने या सेवेकडे नागरिकांनी पाठ फिरवली होती. त्यामुळे याचे भाडे कमी करावे म्हणून आ.मंदा म्हात्रे यांनी अधिवेशनात मागणी केली होती आणि त्यांच्या मागणीला यश आले असून आता कमी भाडे आकारून ही सेवा सुरू होत आहे.

टप्प्याटप्प्यात नवी मुंबईहून मुंबई, जेएनपीटी, एलिफंटा, रेवस या ठिकाणी जाण्यासाठी वॉटर टॅक्सीचा पर्याय उपलब्ध होणार आहे. प्राथमिक स्वरूपात बेलापूर ते मुंबई असा प्रवास सुरू करण्यात येत आहे. ही वॉटर टॅक्सी १४ ते ५० आसनी क्षमतेची असून याकरिता प्रवाशांना २५०-३५० रुपये मोजावे लागणार आहेत. या सुरू होणाऱ्या वॉटर टॅक्सीला नवी मुंबईकर किती पसंती देतात हे पुढील कालावधीतच स्पष्ट होईल.

रोटरीतर्फे पोलीस,ज्येष्ठांसाठी आरोग्य शिबीर

। नागोठणे । वार्ताहर ।

रोटरी क्लब ऑफ नागोठणे यांच्या माध्यमातून नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच नागोठणे शहर व परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी पोलीस ठाण्याच्या आवारात श्री दत्त मंदिरातील सभागृहात आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात नागोठणे पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच ज्येष्ठ नागरिकांसह

सुमारे १२५ नागरिकांनी आपल्या आरोग्याची तपासणी करून घेतली.

यावेळी भाई टके, डॉ. प्रवीण बढे व त्यांची टीम, नागोठणे रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन मोदी, आनंद लाड, राजेंद्र पोकळे, सुरेंद्र निंबाळकर, विक्रम जैन, स्वप्नील धनावडे, डॉ. अभिषेक शहासने, डॉ. जी.एस. कोकणे, डॉ. रोहिदास शेळके, डॉ. म्हात्रे, प्रकाश मेस्त्री, श्रेया कुंटे, गौतम जैन, प्रियंका पिंपळे, धीरज मोदी, डॉ. अमिता मोदी यांच्यासह पोलीस बांधव व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

आरडीसी कोलाड शाखेत आर्थिक साक्षरता मेळावा

। खांब-रोहा । वार्ताहर ।

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) आणि रा.जि.सहकारी मध्यवर्ती बँक अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आर.डी.सी.बँक कोलाड शाखेत महिला आर्थिक साक्षरता मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

मेळाव्यात शाखा परिसरातील १५ बचत गटातील जवळपास ७५ महिलावर्ग सहभागी झाल्या होत्या. शाखाधिकारी भावना सरफळे यांनी स्वागत केले. त्यानंतर बँकेमध्ये राबविल्या जाणाऱ्या सर्व आर्थिक योजना व सुविधांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सदर योजनांमध्ये बचत गटाबाबत वैयक्तिक ठेवी व कर्ज योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना आदींबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच होम सेव्हिंग्ज योजना सहभागी न झालेल्या महिलांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. अल्प बचत योजना, विविध ठेव योजना, आवर्त ठेव योजना आदी ठेवींच्या माध्यमातून भविष्यासाठी व दैनंदिन व्यवहारासाठी कशी बचत होऊ शकते याबाबतची माहिती देऊन स्वरोजगार कर्ज योजनेंतर्गत रू.५० हजार ते रू.५ लाख पर्यंत चालू करण्यात आलेल्या कर्ज योजनेची माहिती देऊन या योजनेचाही लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. शेवटी संक्रांत सणाचे पार्श्वभूमीवर हळदीकुंकवाचे वाण, तीळगुळ, गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन उपस्थित महिलावर्गाला सन्मानित करण्यात आले.

■ युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांची शासकीय निर्णयानुसार जयंती (१९ फेब्रुवारी) साजरी होणार आहे. यानिमित्त जुन्या पनवेल- पुणे महामार्गावर राजस्थानी मूर्ती कलाकार शिवाजी महाराज यांच्या विविध आकारातील मूर्ती तयार करीत आहेत. (छाया - राजेश डांगळे)

समाजोपयोगी उपक्रमांद्वारे वाढदिवस

। रसायनी । वार्ताहर ।

राष्ट्रवादी रायगड जिल्हा महिला अध्यक्षा उमाताई मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला बचत गटांना रोजगारासाठी दळण मशिन व पापड मशिनचे वाटप करण्यात आले. दिव्यांग (अपंग) यांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. तर माजी सरपंच संदिप सुदाम मुंढे यांच्या प्रयत्नाने नवीन वसाहत रिस येथे डजबिनचे वाटप करण्यात आले. तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी बेंच लावण्यात आले.जनता विद्यालय शाळेच्या ध्वजाजवळ हायमास्ट लावण्यात आले. यानंतर नविन पोसरी हनुमान मंदिराच्या पटांगणात विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. तर महिलांसाठी हळदीकुंकू व गुरु कदम पुरस्कृत 'चला खेळूया पैठणीचा खेळ' हा मनोरंजनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला रसायनी परिसरातील असंख्य महिला उपस्थित होत्या. उमाताई मुंढे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाला सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

माथेरानमध्ये रोहिदास जयंती

। माथेरान । वार्ताहर ।

संतशिरोमणीरोहिदासमहाराजांची ६४७ वी जयंती संत रोहिदास नगर येथे मोठ्या आनंदाने साजरी करण्यात आली. यानिमित्ताने येथील समाजमंदिरात श्री सत्यनारायणाची महापूजा आयोजित करण्यात आली. त्याचप्रमाणे भंडाऱ्याच्या महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

यावेळी चंद्रकांत चौधरी, संदीप शिंदे, प्रकाश सुतार, निखिल शिंदे, गौरंग वाघेला यांसह अन्य पक्षाच्या नेतेमंडळीसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शवली.

'यळकोट यळकोट जय मल्हार'चा जयघोष

रेवस, बोडणीत माघी पौर्णिमा उत्साहात

। खारेपाट । वार्ताहर ।

मल्हारी मार्तंड माघ पौर्णिमा उत्सव रेवस बोडणी कोळीवाड्यात हजारोंच्या संख्येने कोळी बांधवांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. रेवस-बोडणी कोळीवाड्यातून जेजुरी कडेप्रस्थान सोहळ्याची सुरुवात झाली. रेवस बोडणी गावातील सर्व कुटुंबातील देवहाऱ्यातील देवांची मिरवणुक निघून भंडारा उधळत 'यळकोट यळकोट जय मल्हार' च्या या नाम घोषात भक्तांच्या पटागणांत आनंदोत्सवात नेण्यात आले.

संपूर्ण रेवस कोळीवाडा पिवळ्या भंडाऱ्याने जयघोष करीत दुमदुमून गेला. यावेळी महिला वार्गकडून आपल्या कुटुंबातील देव्हाऱ्यातील देवांची उद, पुजा, आरती, करण्यात आली. तसेच खंडेरायाला साकडे घालण्यात आले की, कोळी बांधवांच्या धंद्यास बरकत होवो. येथून देवाची पालखी राम मंदिराजवळ आली व तेथून जेजूरीकडे प्रस्थान झाले. विशेष म्हणजे या सोहळ्यास रेवस बोडणी परिसरातील बालवर्ग, युवकवर्ग व कोळी बांधव भगिनींनी आपले आपले पारंपारीक वेषभूषा करुन सांस्कृतिक नृत्य सादर करीत आपला आनंद व्यक्त केला.

हा सोहळा यशस्वी होण्यासाठी रेवस-बोडणी गावाचे अध्यक्ष अमर नाखवा तसेच रेवस-बोडणी मच्छिमार संस्थेचे चेअरमन विश्वास नाखवा तसेच रेवस-बोडणी परिसरातील प्रतिष्ठित मंडळी व हजारोंच्या संख्येने कोळी बांधवांचे सहकार्य लाभले.

जुन्यातील जुने मूळव्याध खूनी व बादी
२७ वर्षांपासून पाइल्समध्ये विश्वसनीय नाव
Pilma FOR PILES
No Side Effect
Pilma®
मूळव्याध
पिल्मा पावडर व टॅब्लेट्स
प्रभावकारी आयुर्वेदिक औषध
विनाऑपरेशन. खाण्या-पिण्याचे कोणतेही बंधन नाही. कोणताही दुष्परिणाम नाही.
★ सर्व प्रकारच्या मूळव्याधमध्ये (खूनी व बादी) लाभकारी.
★ जळजळ होणे-सूज-रक्तस्राव मध्ये आराम देते.
★ पिल्मा पाचनशक्तीमध्ये आराम देते.
★ शौचास कोणत्याही वेदनेशिवाय होते.
★ कमजोरी दूर करून शरीरात उत्साह वाढवते.
★ ॲसिडीटी-छातीची जळजळपासून त्वरीत आराम.
Email: vnpharma1@gmail.com I www.vnpharmaceutical.com
HELPLINE: 98197 85363 / 90048 56166
Available at all medical and ayurvedic stores
Wanted Distributor for all over India.

केवळ चर्चा

वर्ध्यातील साहित्य संमेलनात अध्यक्ष नरेंद्र चपळगावकर यांनी आपल्या भाषणात लेखनाचे आणि विचारांचे स्वातंत्र्य यांचा बराच उहापोह केला. हा विषय अनेक वर्षांपासून चालू आहे. मात्र त्याची परिमाणे काळानुसार बदलत गेली आहेत. पूर्वी काँग्रेसच्या काळात, म्हणजे १९७०-८० च्या दशकात, मंत्र्यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर बसावे का यावरून घमासान चर्चा झाल्या. लोकनिधीतून मुंबईत समांतर साहित्य संमेलन भरवण्यात आलं. नंतर संमेलनाच्या खर्चासाठी कायमस्वरुपी महाकोष उभारण्याची कल्पना पुढे आली. पण तिला फार आकार आला नाही. अलिकडे पैसा आणि संमेलनाच्या आयोजनासाठीचे स्थानिक मनुष्यबळ हे राजकीय पक्षच पुरवू शकतात ही वस्तुस्थिती सर्वांना मान्य आहे. त्यामुळे राजकारणी मंचावर असणारच हे सर्वांनी गृहित धरले आहे.मात्र भाजपच्या सत्तेच्या काळात राजकारण्यांचा वावर संमेलनाच्या मंडपापुरता सीमित राहिलेला नाही. लेखकांनी अमुक गोष्टींवर लिहिताच कामा नये अशा स्वरुपाची बंधने घालणारे वातावरण तयार झाले आहे. ऐतिहासिक महापुरुष, धर्म, देव-देवता यांच्यासंबंधीचे चिकित्सक लिखाण तर सोडाच पण उल्लेखदेखील फार जपून करावे लागतात. पन्नास वर्षांपूर्वी लिखाण किंवा नाटका-सिनेमात शिवाजी किंवा तुकाराम असे एकेरी उल्लेख सहज केले जात. राम, कृष्ण इत्यादींशी जवळीक किंवा प्रेम व्यक्त करण्यासाठी जसा एकेरी उल्लेख केला जातो तसाच हा प्रकार होता.

अघोषित आणीबाणी

पण आता सर्वांच्या संवेदना नाजूक झाल्या आहेत. महापुरुषच नव्हे तर देवादिकांबद्दलदेखील पूर्वापार आपल्याकडे अनेक प्रकारचे चिकित्सक लिखाण होऊ शकत असे. महात्मा फुले यांचे लेखन किंवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार इत्यादींनी केलेली रामायणाची चिकित्सा हे त्याचे ठळक उदाहरण आहे. आता मात्र सामान्य लेखकाला आपले देव, धार्मिक प्रथा, परंपरा यांच्याबद्दल दुरान्वयानेही काही टीकात्मक उल्लेख तर आपल्या हातून होत नाही ना याची काळजी घ्यावी लागते. तुकाराम महाराजांबाबतच्या पुस्तकामुळे आनंद यादव यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद गमवावे लागले. रामचरितमानसामधील मागास जाती व स्त्रियांबद्दलच्या अत्यंत आक्षेपार्ह उल्लेखांवरून टीका करणाऱ्या उत्तर प्रदेश व बिहारातील नेत्यांविरुध्द मोठा गदारोळ सध्या चालू आहे. विविध जाती-जमातींविषयीचे उल्लेख, म्हणी, शब्द, समीक्षा याबाबतही हेच खरे आहे. मध्यंतरी तर नरेंद्र मोदींवर साधी टीका केली तरी देशद्रोहापर्यंतचे गुन्हे दाखल होत होते. लेखक कोणतीही साहित्यकृती घडवतो तेव्हा त्याने बाहेरच्या गोष्टींचा दबाव न घेता मुक्तपणे आविष्कार करावा असे म्हटले जाते. तसे झाले तरच कलेच्या आणि लोकांच्या आकलनाच्या कक्षा विस्तारत जातात. पण भाजपच्या राजवटीत सध्या सर्वत्र इतका द्वेष आणि तेढ निर्माण केली गेली आहे की असा मुक्त आविष्कार अशक्य वाटावा. लेखकही बहुदा आपसूक, मनातल्या मनात अनेक विषय व उल्लेख बाद करीतच लिखाण करीत असावेत. वर्ध्याच्या साहित्य संमेलनात अध्यक्ष नरेंद्र चपळगावकरांनी याचाच विस्ताराने उहापोह केला. त्यात त्यांनी भावात्मक स्वातंत्र्य अशी संकल्पना मांडली. अमुक प्रकारचे मी लिहिले तर पुरोगामी किंवा प्रतिगामी ठरू किंवा तमुक लिहिले तर लोकप्रिय होऊ अशा विचाराने ठराविक रीतीने लिखाण करणे म्हणजे भावात्मक स्वातंत्र्य गमावणे असे ते म्हणतात. या संदर्भात त्यांनी कवी मर्ढेकरांवरच्या अश्लीलतेच्या खटल्यात कोणीही मराठी साहित्यिक त्यांच्या बाजूला उभे राहिले नव्हते याचा उल्लेख केला. मर्ढेकरांना गांधीवादी नेते स.ज. भागवत यांनीच तेवढा पाठिंबा दिला होता याची आठवण ते करून देतात. शिवाय, माणसाच्या जिभेप्रमाणे त्याच्या मनावर नियंत्रण ठेवण्याची हुकुमशहांची इच्छा असते हे स्पॅनिश विचारवंत बारूश द स्पिनोझाचे वचनही ते उद्धृत करतात. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, चपळगावकर याहून पुढे गेले नाहीत. त्यांनी आहे हीच वस्तुस्थिती सर्वांसमोर पुन्हा एकदा मांडली. त्यावरील उपाय काही त्यांनी सुचवले नाहीत. असे उपाय एका व्यक्तीला व एका भाषणात मांडणे शक्य नाही हे उघड आहे.

भाषणाने निराशा

मात्र मराठवाडा मुक्ती संग्रामाचा जवळून घेतलेला अनुभव आणि न्यायमूर्ती म्हणून व्यतीत केलेली प्रदीर्घ कारकीर्द लक्षात घेता त्यांच्याकडून रसिकांच्या अधिक अपेक्षा होत्या. त्या पूर्ण झाल्या नाहीत असेच म्हणावे लागेल. अध्यक्षांनी आपल्या भाषणात मराठीत सकस वैचारिक साहित्य पुरेशा प्रमाणात निर्माण होत नाही याबद्दल खंत व्यक्त केली. एका अर्थी ती खरी आहे. समतोल किंवा सर्वांगाने चिकित्सा केलेला असा विचार मराठीच नव्हे तर इतरही भाषांमध्ये सध्या कमीच मांडला जातो आहे. नरेंद्र मोदींच्या आगमनानंतर देशात ते विरुद्ध आम्ही असे जे एक युध्द पेटवण्यात आले आहे त्याचाही हा परिणाम आहे. अनेकांना एरवी एक समतोल भूमिका घ्यायला आवडेल. उदाहरणार्थ सध्याचा द्वेष नसता तर अगदी नरेंद्र मोदींच्या कार्यपद्धतीतील गुणांची चर्चाही अनेकांनी आनंदाने केली असती. पण वातावरणच असे करण्यात आले आहे की विशिष्ट भूमिका वा राजकीय अभिनिवेश घेतल्याशिवाय बोलणे अशक्य झाले आहे. चपळगावकरांनी याबाबतही विवेचन केले असते तर बरे झाले असते. आणखी एक म्हणजे अध्यक्षांनी ललित साहित्याची अगदीच नगण्य दखल घेतली. खरे तर साहित्य संमेलन म्हणजे ललित साहित्याचा उत्सव. एरवी विविध विचारांची व पक्ष-संघटनांची संमेलने आपल्याकडे नेहमी होतच असतात. साहित्य संमेलनात कथा, कादंबरी, कविता यांच्याबाबत अधिक चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते. पण ती पूर्ण होण्याचा काळ बहुदा इतिहासजमा झाला आहे. आपल्या भाषणात त्यांनी मराठी भाषेच्या ऱ्हासाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. आज पाच ते पंधरा वयोगटातील इंग्रजी माध्यमात जाणाऱ्या मुलांची संख्या मराठीवाल्यांपेक्षा अधिक आहे ही चिंता करण्यासारखीच गोष्ट आहे. यामुळे आणखी वीस-पंचवीस वर्षांनी मराठी साहित्य, वृत्तपत्रे, नाटके, सिनेमा इत्यादींचे भवितव्य काय असा प्रश्नच आहे. दुर्दैवाने याही प्रश्नाबाबत ठोस उत्तर कोणाकडेही नाही. यावरचे उपाय अमलात आणण्याची ताकद आणि विचारशक्ती यांचाही समाजात अभाव आहे.

विचार

बालविवाहांचे आव्हान

शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपरिपक्व वयामध्ये लग्नबंधनात अडकलेले किशोर-युवा निकोप सहजीवन अनुभवू शकत नाहीत. त्यांच्या अपत्यांनाही आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागू शकतो. म्हणूनच भारतामध्ये विवाहयोग्य वयाविषयी कायदा आहे. मात्र त्याकडे दुर्लक्ष करत आजही राजरोसपणे बालविवाह होताना दिसतात. कोरोनाकाळात याची नव्याने झलक दिसली. आता तरी याविषयी कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.



मधुरा कुलकर्णी

कोरोनाकाळाने समाजातील बऱ्या आणि वाईट अशा दोन्ही बाजूंचे दर्शन घडवून दिले. या काळात बालविवाहांचे वाढते प्रमाण ही सामाजिक जाणिवांची नामुष्की होती, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आजपर्यंत सरकारने बालविवाह अयोग्य असल्याचे जनमानसावर ठसवण्यासाठी अनेक योजना राबवल्या. त्यातील धोक्यांबद्दल सूचित करणारे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. मात्र त्यानंतरही भारतीय जनमानस याप्रती सजग नसल्याचे अनेक उदाहरणांवरुन दिसून येते. कोरोनाकाळ उलटल्यानंतरही अल्पवयीन मुलामुलींची लग्न लावून देताना काही पालकांच्या मनात अपराधी भाव उत्पन्न होत नाही. विशेषत: मुलींना आपल्ल्यावरील ओझे मानणाऱ्या घरांमध्ये त्यांचे लवकरात लवकर लग्न लावण्याचा प्रबळ विचार असतो. खरे पाहता आपल्याकडे कायद्यानुसार मुलामुलींचे वय निश्चित करण्यात आले असून त्याआधी लग्न लावल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जातो. जागल्याची भूमिका बजावणाऱ्या अनेक संस्था असे प्रकार उघडकीस आणणातही. मात्र त्यांना न जुमानता आजही घरातील ही अनावश्यक जबाबदारी लवकरात लवकर दुसऱ्याच्या खांद्यावर टाकण्याचा प्रयत्न करणारे काही कमी नाहीत. त्यामुळेच इतकी वर्षे चर्चेत असणारा हा विषय आजही चघळावा लागतो.

स्त्री आणि पुरुष हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. ते भावी पिढ्यांचा आधार आहेत. त्यामुळेच पुढली पिढी सर्वार्थाने आरोग्यसंपन्न होण्यासाठी आधी लग्नव्यवस्थेने काही नियम पाळण्याची गरज अनेकदा बोलून दाखवली जाते. कमी वयात लग्न केल्यास गर्भधारणेमध्ये जीवघेण्या अडचणी उत्पन्न होतातच, खेरीज जन्मणाऱ्या बालकातही काही शारीरिक समस्यांची शक्यता वाढते. मात्र याचा विचार न करता आजही बिनधोक असे प्रकार घडताना दिसतात. हे लक्षात घेऊनच काही राज्यातील सरकारांनी १४ वर्षांखालील अल्पवयीन मुलींशी विवाह करणाऱ्या पुरुषांविरुद्ध 'पोक्सो' कायद्यांतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. राज्यातील बालमृत्यू दर आणि माता मृत्यू दर कमी करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील बालविवाह रोखण्यासाठी मंत्रिमंडळाने ग्रामपंचायत सचिवांना बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ अंतर्गत 'बालविवाह प्रतिबंध (प्रतिबंध) अधिकारी' म्हणून नियुक्त केले. वधूचे वय १४ वर्षांपेक्षा कमी असल्यास हे अधिकारी 'पोक्सो' कायद्यांतर्गत फिर्याद नोंदवतील, अशी व्यवस्था केली. दुसरीकडे, मुलीचे वय १४ ते १८ वर्षे दरम्यान असेल तर बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ अंतर्गत फिर्याद दाखल करण्याची तजवीजही करण्यात आली. लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी 'पोक्सो' (प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स ॲक्ट) कायदा आहे. त्यामध्ये सात वर्ष किंवा अधिक काळासाठी जन्मठेप आणि दंडापर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे.

कर्नाटक सरकारने बालविवाहाविरोधात अशा कायदेशीर कारवाईची तरतूद केली. त्यानंतर तिथे ११ हजार बालविवाह रोखले गेले आणि अशी मोहीम राबवून दहा हजारांहून अधिक जोडप्यांना पकडले. मात्र असे बरेच प्रयत्न होऊनही परिस्थिती 'जैसे थे' असल्याचे दिसून येते. एका अहवालानुसार, आसाममध्ये ११.७ टक्के स्त्रियांनी लहान वयातच मातृत्वाचे ओझे उचलले आहे. याचा अर्थ आसाममध्ये अजूनही बालविवाह मोठ्या प्रमाणात होत आहेत. या राज्यातल्या धुबरी जिल्ह्यातील २२ टक्के मुलींची लग्ने कमी वयातच झालीच, पण लहान वयात त्या माताही झाल्या. आसामच्या जिल्ह्यांमध्ये बालविवाहाच्या अधिक प्रकरणांची आकडेवारी दिली आहे. तिथे बंगाली वंशाच्या मुस्लिम समुदायाची लोकसंख्या जास्त आहे. याशिवाय इतर काही जमातींमध्ये बालविवाहाची प्रकरणे अधिक आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार आसामची एकूण लोकसंख्या तीन कोटी दहा लाख आहे. लोकसंख्येच्या सुमारे ३४ टक्के मुस्लिम आहेत तर चहाच्या जमाती लोकसंख्येच्या १५-२० टक्के आहेत. चहा जमातीच्या जोरहाट आणि शिवसागर जिल्ह्यात २४.९ टक्के मुलींची लग्ने १४ वर्षांपेक्षा कमी वयात झाली आहेत. आसाममध्ये, विशेषत: मुस्लिमबहुल भागात बालविवाहासारख्या गैरप्रकारांच्या विरोधात काम करणाऱ्या 'ऑल आसाम मायनॉरिटी स्टुडंट्स युनियन'च्या कार्यकर्त्यांनी अल्पवयीन मुलींशी विवाह करणाऱ्या पुरुषांवर 'पोक्सो' कायदा लागू करण्याला पाठिंबा दिला आहे.

आसाममध्ये जातीय सलोखा राखण्याची जबाबदारी मोठी आहे. येथिल अल्पसंख्याक विद्यार्थी संघटनेच्या सहाय्यक म्हणतात की अनेक कारणांमुळे अल्पसंख्याक समाजात बालविवाह ही एक सामान्य प्रवृत्ती बनली आहे. याचे मूळ कारण शिक्षणाचा अभाव आणि आर्थिक मागासलेपण हे आहे. कधी कधी मुस्लिम समाजातील काही काझी लोकांची दिशाभूल करतात. मुस्लिमांना जास्त मुले असल्याच्या आरोपांना उत्तर देताना ते म्हणतात, की पाचव्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, गेल्या १४ वर्षांमध्ये आसाममधील मुस्लिम समुदायातील जन्म दर अतिशय वेगाने कमी झाला आहे. धुबरी आणि दक्षिण सलमारा या दोन जिल्ह्यांचा बालविवाह आणि लहान वयात मुले होण्याबाबत उल्लेख केला जातो. हे दोन्ही जिल्हे मुस्लिमबहुल आहेत. जिल्ह्यात २२ टक्के अल्पवयीन मुली माता बनत आहेत. पोलिसांकडून होत असलेल्या कारवाईबाबत पोलिस अधीक्षक सांगतात की, जिल्ह्यातील बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी पोलिस सातत्याने कारवाई करत आहेत. बालविवाहाची ६९ प्रकरणे नोंदवली आहेत; परंतु एकही गुन्हा नोंदवण्यात आलेला नाही. खरे तर हा संपूर्ण परिसर मुस्लिमबहुल आहे. त्यामुळे अनेक वेळा लोक पोलिसांना माहिती देत नाहीत. बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ च्या काही कलमांमध्ये आरोपींना जामीन मिळतो. 'पॉक्सो' लागू केल्यास जामीन मिळत नाही. परिणामी, अशा प्रकरणांमध्ये नव्याने कारवाई केली जाईल.

गेल्या २८ वर्षांपासून सरकारी काझी म्हणून काम करत असणाऱ्या मौलानांनी सांगितले की मुस्लिमांनी मुलांची लग्ने करण्याऐवजी त्यांना शिक्षण दिले पाहिजे. बालविवाह रोखण्यासाठी घेतलेल्या निर्णयात सर्वांचे भले आहे. काही गैर-सरकारी काझी, इमाम पैशाच्या लालसेपोटी लग्नाच्या वेळी मुला-मुलींचे वय तपासत नाहीत. अशा लोकांवर सरकारने कडक कारवाई करावी. शरीयतमध्ये कुठेही मुलीच्या लग्नाचे वय काय असावे याचा उल्लेख नाही. यावर बोलताना एक ज्येष्ठ अभ्यासक म्हणतात की बालविवाह केवळ मुस्लिम ांमध्येच नाही तर अनेक जमातींमध्येही होत आहे. बालविवाह पूर्णपणे थांबवायला हवेत. यात कोणत्याही प्रकारचे राजकारण होता कामा नये. बालविवाह रोखण्यासाठी मोठी कारवाई करण्याची जबाबदारी पोलिसांवर आहे. एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की बालविवाह रोखण्यासाठी अनेक नवी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात आली असून फिर्यादीचे वेगळे स्वरूप तयार करण्यात आले आहे. 'नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे'नुसार भारतातील दहापैकी दोनपेक्षा जास्त मुलींचे लग्न वयाच्या अठराव्या वर्षाआधी झाले आहे. भारतात बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंध कायदा, २००६ आहे. हा कायदा २००७ मध्ये लागू करण्यात आला. या कायद्यानुसार लग्नाच्या वेळी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असावे. बालविवाहाच्या प्रकरणांमध्ये कायद्याचे उल्लंघन केल्यास दोन वर्षे सश्रम कारावास आणि एक लाख रुपये दंडाची तरतूद आहे. या कायद्यात महिलांना विशेष सवलत आहे. ती दोषी ठरली तरी तिला तुरुंगवासाची शिक्षा दिली जात नाही; मात्र असे असूनही अद्याप बालविवाहावर पूर्णपणे बंदी घालण्यात आलेली नाही, हे विशेष. त्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आता याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

आजकाल

महाराष्ट्र फाऊंडेशनचे पुरस्कार वितरण

'महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिका'च्या पुरस्कार सोहळ्यात खूप गोष्टी लक्षात ठेवण्याजोग्या होत्या.

मात्र प्रसंगांच्या मालिकांमधली एक चौकट सतत आठवतेय...

भालचंद्र नेमाडेंच्या हस्ते होणार्या सत्कारासाठी, स्टेजवरील उपस्थित सदस्याच्या सोबतीला, प्रेक्षकांमध्ये बसलेल्या अन्य सदस्यांनाही बोलावण्यात आलं. ट्रेमधून पुष्पगुच्छ, शालीवजा शेला आणि स्मृतीचिन्ह घेऊन एक कार्यकर्ता स्टेजवर आला. प्रेक्षागृहातून सगळे एकेक करून येताहेत नि समोरून चित्रीकरण करणार्या कॅमेर्यात दिसायला नको म्हणून तो मुलगा सत्काराचं साहित्य चटकन देऊन पुन्हा बाजूला गेला. ते दोन-तीन जण येईतो काही मिनिटं गेली. दरम्यान सत्काराचं साहित्य असलेला ट्रे घेऊन अतिशय शांतपणानं नेमाडेसर मध्यभागी उभे होते. 'लेखकाचा लेखकराव होऊ न देणं'चा एक अर्थ चटकन समोर तरळल्यासारखं झालं. आपण जे कोणी आहोत, ज्या प्रचंड उंचीवर आहोत, जो आवाका आहे तो सतत आठवणीत ठेवणारी आणि त्याचा दुसर्यांना विसर पडू न देणारी मंडळी प्रत्येकाच्या पाहाण्यात असतात. मलाही तशी काही आठवली. त्या पार्श्वभूमीवर सहजसाधेपणानं उभ्या असणार्या नेमाडे नावाच्या वयानं पिकलेल्या आणि मिश्किलपणाचीही चढती कमान असणार्या मिशीवाल्या, ताठ उभ्या या आजोबांबद्दल काय-काय वाटलं, सांगता येत नाही. 'ताठ बसा!' असं सांगणार्या बाई किंवा गुरूजी दिसताच आपण कणा ताठ करतो तसं त्यांच्या शिडशिडितपणामुळे आणि लीनतेमुळे अधिकच ताठ भासणार्या देहाकाराकडे बघताना 'ताठ बसायला हवं' ही आठवण कण्याला करवून द्यावी लागली नाही. - आपल्या 'असण्याचं' ओझं न देणारी त्यांची ट्रे घेऊन शांत उभी असलेली आकृती बर्याच कशाकशाचं भान आता देत राहाणार आहे हे नक्की. राजन गवस आणि रंगनाथ पठारे यांना काय झालं ते मागून कळलं. तत्क्षणी गवस सरांनी उठून नेमाडे सरांच्या हातातला ट्रे घेतला. हे दुसर्या कोणाला सुचलंच नव्हतं. जितकं जास्त काम, जितका जास्त व्यासंग, जितकी अधिक सखोलता तितकी लीनता, सहजभाव माणसांमध्ये उगवत जाणं हे फार सुंदर आहे.

निरंतरपणे आपापल्या क्षेत्रात सर्जनाच्या कामात बुडालेल्या मोठ्या आणि समवयीन माणसांच्या सोबतीने स्टेजवर बसण्यातूनही जबाबदारीची जाणीव होत राहाते. त्यामुळंच असं झालं की माझं नाव पुकारलं गेल्यावर नेमाडेसरांच्या हातून पुरस्कार स्वीकारण्याचा क्षण यायच्या आधी पोटापाठीतले स्नायू इतके गोळा झाले की काही सुचेना क्षणभर! वाटलं, कार्यरत माणसांची मांदियाळी इथं गेली अठ्ठावीस वर्ष पुरस्कार देते आहे. तितक्याच तोलामोलाच्या पाहुण्यांकडून पुरस्कार प्रदान केला जातो आहे. स्टेजच्या मध्यभागी गेल्यावर नेमाडेसर म्हणाले, मी काम पाहातोय. काम सतत चालू राहिलं पाहिजे, जराही थांबायचं नाही. काम चालूच राहिलं पाहिजे. चांगला करा! घरातल्या कोणाही ज्येष्ठ माणसानं ज्या मायेनं सांगावं तसा तो स्वर होता. त्यामुळं ताण निवळला हे सांगायला नकोच.

कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध होता. पुरस्काराला उत्तर म्हणून रंगनाथ पठारे, सत्यजीत रथ, शांताराम पंदेरे बोलले. नेमकं आणि मोजकं. बाकी सगळ्यांची मनोगते व्हिडिओ द्वारे दाखवण्यात आली. त्यासाठीही समन्वयक मुकुंद टाकसाळेंनी जास्तीजास्त साडेचार मिनिटांची मर्यादा घालून दिली होती. त्यांचं काम तर अत्यंत काटेकोर. फोन आला की वाटायचं, 'अरे बापरे, आपल्याकडून अजून सांगितल्याप्रमाणं काय द्यायचं राहिलं असेल!' फाउंडेशनच्या वतीने शोभा चित्रे, राजीव भालेराव बोलले. 'मासूम'च्या रमेश अवस्थींनी अगदी मोजक्या शब्दात आभार मानले. तसंच प्रास्ताविक 'मासूम'च्या मनीषा गुप्तेंनीही केलं होतं. सूत्रसंचालन तर चक्क साधनाचे संपादक विनोद शिरसाठ करत होते. एकावेळी बरीच व्यवधानं सांभाळत असल्यामुळं त्यांनी संदेशच्या नाटकाचं नाव गडबडीत 'पुनश्च हनीमून' ऐवजी 'पुनश्च हरिओम' असं घेतल्यावर हशा पिकला. शिरसाठांनी जिभेचं ते निसटणं नंतर अवधान राखून गमतीनं चालवत ठेवलं. अत्यंत गंभीर संपादकाकडून असा प्रासंगिक विनोद घडावा याने गंमत आली. ही खुमारी वाढली ती नेमाडे सरांच्या भाषणानं. ते आपल्या भाषणात सतत नव्या नव्या मुद्द्यांची भर काळजीपूर्वक घालत होते असं दिसतंच होतं. मात्र बोलताना त्यांनी सूरच मोठा खट्याळ लावला होता. - असे परिवर्तनवादी चळवळीचे पाठीराखे सुनील देशमुख नसण्याची चुटपूट सगळ्यांनाच लागून राहिली होती. मात्र मुकुंद टाकसाळेंनी स्मरणिकेच्या प्रास्ताविकात लिहिलंय त्याप्रमाणे, - 'आजचा काळ फार वेगळा आहे. 'पुरोगामी' तर सोडा, पण 'उदारमतवादी' या शब्दाचा वापरसुद्धा शिवीसारखा केला जातो. अशा काळात सुनील देशमुखांचं कार्य पुढे नेण्याची कधी नव्हे एवढी आवश्यकता आज निर्माण झालेली आहे. ते तसे पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरू शकते.'

- सोनाली नवांगुळ

व्हायरल

श्री श्री रवीशंकर आणि एकनाथराव

जालना जिल्ह्यात आज श्री श्री रविशंकर आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ही दोन महान व्यक्तिमत्त्वे एकाच व्यासपीठावर आली होती. त्यामुळे समस्त महाराष्ट्र भरून पावला... आम्ही गुंतवणूक आणण्यासाठी डावोसला गेलो होतो. तेव्हा आम्हाला गुरुदेव (श्री श्री) भेटले, अशी माहिती एकनाथजींनी दिली. जेव्हा आम्ही गुवाहाटीला गेलो होतो, तेव्हा श्री श्रीं मला फोन करून आशीर्वाद दिला, असेही एकनाथजी म्हणाले. तुम्ही चांगले काम करत आहात, तुम्हाला यश मिळेल ,असा आशीर्वादही म्हणे गुरुदेवांनी त्यांना दिला.. एकनाथजींची गुंतवणूक भाजपमध्ये आहे, तर गुरुदेवांची अध्यात्मामध्ये! श्री श्रींनी नवी दिल्लीत 'दि वर्ल्ड कल्चर फेस्टिवल' भरवला होता, तेव्हा त्याचे उद्घाटन मोदीजींच्या हस्ते झाले. त्याच्या आदल्याच दिवशी पर्यावरणाचा भंग केल्याबद्दल श्री श्रीं ना पाच कोटी रुपयांचा दंड झाला होता. पण मी दंड भरणार नाही, वाटल्यास मला तुरुंगात टाका, असा पवित्रा त्यांनी धारण केला! आणि तरीही, अशा व्यक्तीच्या कार्यक्रमास मोदीजींनी हजेरी लावली...यमुनातीरी भरलेल्या श्री श्रीं च्या कल्चर फेस्टिवलसाठी लष्कराने तरंगते पूल बांधून दिले. नगरविकास खात्याने स्वच्छतागृहे उभारून दिली. सरकारी कंपन्यांनी स्पॉन्सरशिप दिली. २००१ मध्ये महाकुंभ झाला, तेव्हा विहिंपने धर्मसंसद भरवली होती आणि श्री श्री हे त्यात सहभागी झाले होते. त्याच धर्मसंसदेत 'अयोध्येत राम मंदिर झालेच पाहिजे' अशी घोषणा पुन्हा एकदा देण्यात आली होती. भाजपचे लाडके असलेल्या अण्णा हजारेंच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनात श्री श्री देखील होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकांत 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या स्वयंसेवकांनी खुलेआम मोदींसाठी प्रचार केला होता. असो. एक पंचतारांकित गुरु आणि महाराष्ट्रातील मोजक्या नेत्यांना समृद्ध करणाऱ्या गटाचा थोर नेता हे एकत्र आल्यामुळे सर्व मानवजातीचे 'ठाणे-कल्याण' होणार आहे, यात शंका नाही.. २०१४ मध्ये देवेंद्रजींनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हा सर्व साधुसंतांना आमंत्रित केले होते. मराठवाडा ही संतांची भूमी, तेथेच शिंदेजी आणि श्री श्री एकत्र आले होते. एकनाथजी देखील राजकारणातील संतपुरुषच. देवेंद्रजी रेशीमबागेच्या पुण्यभूमीत वाढलेले आणि या सर्वांचे परात्पर गुरु म्हणजे मोदी. ते तर विष्णूचे अकरावे अवतार. हे सगळे पाहून आणि ऐकून कसे पवित्र आणि शुद्ध वाटत आहे.. या आयुष्यात कधीही साबणाची किंवा वॉशिंग मशिनची गरजच भासणार नाही, असेच वाटत आहे. यापुढे मुख्यमंत्री शिंदे यांना 'श्री श्री शिंदे' असे संबोधावे काय?

- हेमंत देसाई

हिंदु पुराणकथा मधून आदिवासीं समूह बहुतेक वेळा दुष्ट, क्रूर राक्षस म्हणून समोर येतात. यज्ञ कार्यात व्यत्यय आणणारे, आश्रमावर हल्ला करणारे वगैरे. खरे तर वैदीक संस्कृतीचे पाईक जेंव्हा भारतात आले तेंव्हा इथे सगळा प्रदेश मोकळा पडला नव्हता. स्थानिक राजे, राज्य, प्रशासन पद्धती होत्या. दोन्ही मध्ये संघर्ष झाला. युद्ध झाले, सांस्कृतिक संघर्ष झाला. सरमिसळ पण झाली.हिंदु पुराणकथा मध्ये असलेले आदिवासींचे चित्रण हे ह्या संघर्षाची सामूहिक आठवण आहे. संघर्षात वैदिक संस्कृति वरचढ ठरली. म्हणून त्यांच्या पुराणकथा सर्व मान्य झाल्या. पण आदिवासीं समूहांची स्वतंत्र मायथोलॉजी आहेच. त्यात ह्या संघर्षाचे चित्र वेगळे आहे. ही सामूहिक आठवण सुद्धा जतन केली पाहिजे. झाडून सगळे हिंदु वनवासी कधीच नव्हते. . ह्याचा पुरावा आपल्या आणि आदिवासींच्या सामूहिक आठवणीत असलेल्या फरकात सापडतो. सगळ्यांना कृत्रिम पणाने एकाच रंगात रंगविण्या पेक्षा अपसातले फरक ओळखून एकत्रीत पणाने पुढे जाणे अधिक श्रेयस्कर. शिवाय जेंव्हा आपण आपल्या पुराणकथा सांगतो तेंव्हा ह्या संघर्षाचा संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे.

- नीरज हातेकर

लोकसंसद

आणखी एका दैवी सुरांचा अंत

गानसम्राज्ञी लतादीदींचा पहिला स्मृतीदिन दोन दिवसांवर आला असताना आणखी एक सुरेल 'वाणी' अबोल झाली. गानसरस्वती वाणी जयराम यांच्या निधनाने संगीत विश्वातील आणखी एका दैवी सुरांचा अंत झाला. आपल्या पाच दशकांच्या सांगीतिक कारकीर्दीत हिंदी, उडिया, तामीळ, तेलुगू, मराठी, कन्नड, मल्याळम, बंगाली इत्यादी १९ भाषांमधील दहा हजारांहून अधिक गाणी गायलेल्या वाणी जयराम यांनी गायली. यावरूनच त्यांच्या गायनाच्या कारकिर्दीचा प्रचंड आवाका लक्षात येतो. १९७१ साली प्रदर्शित झालेल्या 'गुड्डी' या सिनेमातील संगीतकार वसंत देसाई संगीतबद्ध केलेल्या 'हम को मन की शक्ती देना' आणि 'बोले रे पपीहरा' या गाण्यांनी वाणी जयराम यांचे नाव सर्वतोमुखी झाले. 'गुड्डी'च्या यशानंतर, मदन मोहन, इलैयाराजा, केव्ही महादेवन, ओ. पी. नय्यर, लक्ष्मीकांत प्यारेलाल, सी. रामचंद्र, आर. डी. बर्मन अशा दिग्गज आणि प्रतिथयश संगीतकारांबरोबर वाणी जयराम यांनी गायन केले. विलक्षण गोड गळा लाभलेल्या वाणी जयराम यांना 'मीरा' चित्रपटातील गाण्यांमुळे आधुनिक भारताची मीरा म्हटले गेले. संगीतकार वसंत देसाई यांनी 'ऋणानुबंधाच्या जिथून पडल्या गाठी' हे नाट्यपद पंडित कुमार गंधर्व यांच्याबरोबर गाण्यासाठी वाणी जयराम यांना संधी दिली आणि त्यांनी त्याचे सोने केले. तो स्विकारण्याच्या आधीच त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

प्रेरणा

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।।

वनस्पतींना विशिष्ट ऋतूत फुलंफळं येतात, तुकोबा सांगतात, एखाद्या वृक्षास फुलंफळं येतच नसतील तर वसंत ऋतु असून उपयोग होत नाही. माणसाने सुद्धा निर्मळ जीवन साध्य करण्यासाठी स्वतः कृतिशील असलं पाहिजे, फक्त परिस्थिती पूरक असून चालत नाही. तुकोबाला वाटते आपण निर्मळ जीवनाचा मार्ग आतून, मनापासून निवडला पाहिजे, त्या मार्गावर आपण चालले पाहिजे. निर्मळ जीवनाच्या मार्गाने चालण्याची ज्या माणसाची धारणा नसते तेथे कोणतेही प्रबोधन उपयोगाला येत नाही. तुकोबा सांगतात, वांझ स्त्रीस मुलं होत नाहीत अशा परिस्थितीत फक्त नवऱ्याकडे मुलांना जन्म देण्याची क्षमता असून उपयोग होत नाही तसेच नपुसंक पुरुष असेल तर त्याच्या पत्नीस मुलं होणार नाहीत, ती तरी त्याला काय करणार. तुकोबाने मुलांना जन्म देण्यासाठी स्त्री आणि पुरुष दोघांचेही सारखेच महत्त्व सांगितलेले आहे. काळाचा विचार करता तुकोबाचा स्त्री-पुरुषांकडे बघण्याचा दृष्टीकोन समानतेचा होताच पण त्यांची वैज्ञानिक दृष्टीसुद्धा प्रगत होती. जीवन 'निर्मळ' असणं तुकोबाला माणसाचा 'प्राण' वाटतो. तुकोबा म्हणतात, प्राण गेलेलं शरीर कोणताही व्यवहार करू शकत नाही. तसेच निर्मळ जीवन, सद्वर्तन, सदाचार असल्याशिवाय माणसाच्या जीवनात माणूस म्हणून काहीच साध्य होत नाही. माणसाचे जीवन वाया जाते, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे, असे तुकोबाला वाटते.

नाहीं निर्मळ जीवन । काय करील साबण ।।
तैसी चित्तशुद्धि नाहीं । तेथें बोध करील काई ।।
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील वसंतकाळ ।।
वांजे न होती लेकरें । काय करावें भ्रतारें ।।
**नपुंसका पुरुषासी । काय कर

निवडक

संत रोहिदास जयंती

श्रीवर्धन: रानवली गावात श्री संत रोहिदास नगर येथे श्री संत रोहिदास जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे रानवली सरपंच सुरेश मांडवकर, माजी सदस्य राजू लक्ष्मण जाधव, कार्यक्रमास विठ्ठल धामणकर, शाम धामणकर, प्रीतम श्रीवर्धनकर, समीर वालवटकर, राजेंद्र शिवतरकर, अध्यक्ष मुकुंदराज श्रीवर्धनकर, प्रमोद गोरेगावकर हे मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन शीतल धामणकर यांनी केले.

आरोग्य तपासणी शिबीर

पनवेल : कर्करोग दिनानिमित्त दृष्टी फाऊंडेशन संस्थेद्वारे एस.जी.डी पब्लिक स्कूल खांदा कॉलनी, पनवेल येथे जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. दृष्टी फाऊंडेशनचे फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष किशोर देवधेकर यांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे व कर्करोग जनजागृती प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. श्रद्धा कांडपिळे यांनी मोफत आरोग्य तपासणी केली. आजाराविषयी डॉ. ऐश्वर्या मुरली यांनी प्रशिक्षण दिले.

सुकन्या पासबुकचे वाटप

रसायनी : चांभार्लीचे माजी सरपंच अशोक मुंढे यांचा वाढदिवस विविध सामाजिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. बसथांब्यासाठी निवारा शेड,सुकन्या योजना अंतर्गत १०० मुलींना पासबुकचे वाटप व पहिल्या वर्षाचा संपूर्ण हप्ता अशोकभाऊ मुंढे फाऊंडेशनच्या वतीने देण्यात आला. यावेळी काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत, पर्यावरण सेलचे अशोक मोरे, संदीप मुंढे यांच्यासह परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना दप्तर, खाऊ

गोरेगाव : येथील रहिवासी नितीन खुटवळ यांनी त्यांचे दिवंगत वडील कै.भाऊ सखाराम खुटवळ यांच्या स्मरणार्थ व आई आशालता भाऊ खुटवळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिहू केंद्रातील बेणसेवाडी,गंगावणे,बंगाल वाडी, चाफेवाडी, गांधे, बोरावाडी आदिवासी वाड्यांवरील अंगणवाडीतील मुलांना दप्तर आणि खाऊ वाटप केले. यावेळी तुषार मांडवकर, अंगणवाडी सेविका, शिक्षक, उपस्थित होते.

पाणी योजनेचे भूमीपूजन

पाताळगंगा : जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनेचा प्रारंभ आसरे येथे सुरेश पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. यावेळी सरपंच बळीराम जांभळे, उपसरपंच हरेश दुर्गे,ग्रामसेवक पोळ, योगेश नलावडे, बाळ्या कातकरी, जगदीश निकम, मेघा जांभळे, सुनिता पाटील,भागू डुकरे, वर्षा पवार, सुमन कातकरी, नंदकुमार पाटील, ग्रामस्थ तुळशीराम डुकरे, रोहिदास पाटील, कालुराम दुर्गे आदी उपस्थित होते.

दिन वार्ता

पंचांग
६ फेब्रुवारी २०२३
सोमवार
विक्रम संवत्- २०७९
शालिवाहन शके संवत्- १९४४
संवत्सर - शुभकृत्नाम, अयन- उत्तराणायन
मास- माघ, ऋतु- शिशिर, कृष्ण पक्ष
तिथि:प्रतिपदा २६:१८:५३+
नक्षत्र:ओषा १५:०३:२७
योग:सौभाग्य १५:२५:१७
करण:बालव १३:०९:४६
करण:कौलव २६:१८:५३+
सूर्य : मकर चन्द्र : सिंह १५:०३:२७
हिजरी सन् - १४४४, मुस्लिम मास - रज्जब
तारीख - १४
विशेष : गुरुप्रतिपदा, गाणनापूर यात्रा
खंडोबा महाराज यात्रा - मन्हळ खु।। (सिन्नर)
विष्णुबुवा जोग महाराज पुण्यतिथी - आलंदी देवजी

संस्कृत सुभाषित
आत्मानमेव मन्येत कर्तारं सुखदुःखयोः।
तस्माच्छ्रेयस्करं मार्ग प्रतिपद्येत् न त्रसेत्।।
अर्थ : आरोग्य आणि आजार, सुख आणि दुःख यांचे निर्माते आपणच असतो. म्हणून इष्ट व श्रेयस्कर मार्गच नेहमी स्वीकारावा म्हणजे त्रास होत नाही.

सुडोकू

4			3		7		9	
8		1		2		6		
7	6			9	1		4	
		8	6			1		3
		9				2		
5		7			3	9		
	2		4	8			1	9
		5		3		4		8
	8		1		6			5

रविवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

4	5	2	3	6	7	8	9	1
8	9	1	5	2	4	6	3	7
7	6	3	8	9	1	5	4	2
2	4	8	6	5	9	1	7	3
6	3	9	7	1	8	2	5	4
5	1	7	2	4	3	9	8	6
3	2	6	4	8	5	7	1	9
1	7	5	9	3	2	4	6	8
9	8	4	1	7	6	3	2	5

नि:स्पृह सेवेचे सात्विक समाधान

गीता वैशंपायन यांचे प्रतिपादन; श्रीवर्धनला कार्यक्रम

। श्रीवर्धन । प्रतिनिधी । समाजात किंवा शैक्षणिक क्षेत्रात नि:स्पृह ,निरपेक्ष व आत्मियतेने काम केले तर त्याचे सात्विक समाधान व आनंद मिळतो .निराधार बालकांना आईचे प्रेम व वात्सल्य देतांना आम्हाला देव भेटल्याचा आनंद होतो असे भावूक विचार अलिबाग येथील वात्सल्य अनाथाश्रम, सल्लागार गीताताई वैशंपायन यांनी श्रीवर्धन येथे मांडले.

श्रीवर्धन येथील महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्या बोलत होत्या. संस्थेच्या परंपरेप्रमाणे सामाजिक क्षेत्रात अतुलनीय काम करणाऱ्या व्यक्तींच्या हस्ते विजेत्यांना सन्मानित केले जाते.यावर्षी गीताताई वैशंपायन व समन्वयक सुचेता पटवर्धन,शांतीलाल जैन, राजेंद्र भोसले, नितीन सुर्वे, ज्येष्ठ पत्रकार आनंद जोशी,शर्मिला जोशी,प्रशांत सावंत व वासिम फकजी या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत

प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. कल्याणी नाझरे यांनी केले..प्रमुख अतिथींचा परिचय नॅकचे समन्वयक प्रा.वाल्मिक जोंधळे यांनी करुन दिला. यावेळी पीएचडी प्राप्त प्रा.डॉ. निलेश चव्हाण, प्रा.डॉ. योगेश लोखंडे ,प्रा. दिपाली पाठराबे. प्रा.नवज्योत जावळेकर यांचा सन्मान प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आला . प्राचार्य डॉ.श्रीनिवास जोशी,उपप्राचार्य किशोर लहारे,प्रा.वाल्मिक जोंधळे, उल्हास खोपकर ,श्री.कमलेश

दसरे यांचाही सन्मान वैशंपायन, पटवर्धन यांच्या हस्ते करण्यात आले. सुचेता पटवर्धन ,वासिम फकजी,प्रशांत सावंत ,आनंद जोशी,प्राचार्य श्रीनिवास जोशी शांतीलाल जैन,नितीन सुर्व यांनीही यांनीही मनोगत व्यक्त केले. सोहळ्यात सांस्कृतिक विभाग, क्रीडा विभाग,परीक्षा विभाग,रासेयो विभाग,महिला विकास विभाग,ग्रंथालय विभागांतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधून यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विकास समिती सदस्य शांतीलाल जैन यांनी मातोश्री कोकीबाई जैन यांच्या स्मरणार्थ दिलेले जेण्ट्स जनरल चॅम्पियन : जैन हर्ष किशोर ,लेडीज जनरल चॅम्पियन : आयेशा इक्बल मनेर व अकॅडेमीक जनरल चॅम्पियन : आयेशा इक्बाल मनेर, नितीन सुर्वे यांनी प्राचार्य डॉ.श्रीनिवास गोसावी यांच्या स्मरणार्थ पदवी, पदव्युत्तर प्रदान केलेले. तृतीय वर्ष कला प्रथम : कु. चांदोरकर सुविधा मनोहर तृतीय वर्ष, वाणिज्य प्रथम खान मरयम मसूद तृतीय वर्ष विज्ञान प्रथम: दाभिलकर खलील इब्राहिम,एम. कॉम प्रथम: .गजाली हिना शहानूर या विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

कोकण वार्ता

भराडी देवीच्या यात्रेत राजकीय शक्तीप्रदर्शन

एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे, पालकमंत्री रविंद्र चव्हाण, आ.नितेश राणे, विनोद तावडे, आशिष शेलार आदी सहभागी झालेले होते.

। मालवण । प्रतिनिधी ।

तळ कोकणातील प्रसिद्ध भराडी देवीची यात्रा हि सत्ताधारी भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेनेतर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शक्ति प्रदर्शन करण्यात आले.या मार्गावर मार्गावर बाळासाहेबांच्या शिवेसेनेचे आणि भाजपचे झेंडे तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट आउट, फ्लेक्स मोठ्या प्रमाणात झळक होते.

नवसाला पावणाऱ्या भराडी देवीच्या दर्शनाला खुद्द मुख्यमंत्री आगामी मुंबई महानगरपालिकासह इतर महापालिकेच्या निवडणुकांची तयारी निवडणूक आयोगाने केलेली आहे या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. कोरोनाच्या भीतीमुळे गेली २ वर्षे भराडी यात्रा भरली नव्हती त्यामुळे यावर्षी भाविकांची तुफान गर्दी या यात्रेला झाली होती.

त्यात मुंबईहून खास देवीच्या दर्शनाला आलेले विविध पक्षाचे नगरसेवक, आमदार, कार्यकर्ते दिसत होते.

कोकण उन्नती शाळेत स्नेहसंमेलन

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

श्रीवर्धन येथील कोकण उन्नती मित्र मंडळ इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मैदानात वार्षिक स्नेहसंमेलन पार पडले. वार्षिक स्नेहसंमेलनास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी,तहसीलदार सचिन गोसावी,नगरपरिषद मुख्याधिकारी विराज लबडे उपस्थित होते.स्नेहसंमेलन दरम्यान मैदानी खेळ,वैयक्तिक स्पर्धांमधे प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. दोन दिवस झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम साजरे केले. चेअरमन योगेश गंद्रे,सभासद बाळकृष्ण चाचले,सादीक पालकर,आबिद मल्लाक,लेखनीक संतोष कासरूंग,शबिस्ता सरखोत,शैलेश ठाकुर तसेच मुख्याध्यापिका नाझनीन सरखोत,उपमुख्याध्यापीका नियती रिकामे,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

चिरनेरमध्ये रंगले हळदीकुंकू

। चिरनेर । वार्ताहर ।

चिरनेर येथील जाणता राजा, छत्रपती शिवाजी महाराज आणि शिव छावा या ग्राम संघांच्या वतीने ग्रामपंचायतीच्या सभागृहात हळदी कुंकवाचा समारंभ सोहळा प्रचंड उत्साहात पार पडला .

प्रथम आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ,हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली .त्यानंतर उपस्थित महिलांना सौभाग्याचे वाण व भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात, प्रामुख्याने ग्राम संघांना जोडल्या गेलेल्या अनेक बचत गटांच्या महिलांनी आपला सहभाग नोंदविला होता. हळदी कुंकू सोहळ्याचे हे तिसरे वर्ष असून ,या सोहळ्यास महिलांचा प्रतिसाद लाभला होता.

यावेळी महिलांनी पारंपारिक झिम्मा, फुगडी आणि संगीत खुर्ची असे खेळ खेळून, कार्यक्रमात रंगत आणली. ग्राम संघाच्या शकुंतला चिर्लेकर, सोनाली जाधव, अंजली चिर्लेकर तसेच जाणता राजा ग्राम संघाच्या अध्यक्षा स्मिता फोफेरकर, छत्रपती शिवाजी महाराज ग्राम संघाच्या अध्यक्षा वंदना चिर्लेकर, शिव छावा ग्राम संघांच्या अध्यक्षा शरयू ठाकूर या सर्वांनी महिलांसाठी सौभाग्याचे वाण लुटण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे या कार्यक्रमात विशेष कौतुक करण्यात आले.

बचत गटाचे तालुका व्यवस्थापक रामेश्वर मदने यांचे या कार्यक्रमास स्वागत करण्यात आले. शकुंतला चिर्लेकर यांनी उपस्थित महिलांचे स्वागत करुन ग्राम संघांच्या कामाचा आढावा घेतला.

माजी विद्यार्थ्यांकडून शाळेसाठी पाणपोई

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

नांदगाव विद्यालयातील २०००-०१ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव येथील नामदेवशेठ खैरे सभागृहात आयोजित करण्यात आला होता. माजी विद्यार्थ्यांकडून पाणपोई स्टँड बांधून देण्यात आला. या पाणपोईचे उद्घाटन भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. माजी विद्यार्थीनी नीलिमा उतेकर, सुरेखा धनावडे, तसेच प्रसाद मालुसरे, सखाराम शिंदे,किशोर कदम या माजी विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेबद्दल शिक्षकांबद्दल असणारे प्रेम आपल्या मनोगतातून व्यक्त केले. या स्नेह मेळाव्यासाठी प्राचार्य संभाजी ढोपे, माजी प्राचार्य बाळासाहेब साळुंखे, बाळाजी सावंत, कोडजाई हायस्कूल मुख्याध्यापक सुरेंद्र अहिरराव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद, २०००-०१ च्या दहावीच्या बॅचचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन किशोर कदम

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. हॉटेल पतंग, अलिबाग

चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविणे हे ध्येय - साळुंखे

। वावोशी । वार्ताहर ।

विज्ञान-तंत्रज्ञान आणि सुसंस्काराची सांगड घालून चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडवणे हे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे ब्रीद असल्याचे प्रतिपादन संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांनी केले आहे. ते नूतन शालेय इमारतीचे उद्घाटन व हस्तांतरण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

गोदरेज कंपनीच्या सहकार्यातून ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर आणि गोदरेज अँड बॉईस मॅन्यु. कं.लिमिटेड यांच्या संयुक्तिक प्रयत्नाने वावोशी येथे बांधण्यात आलेल्या नूतन शालेय इमारतीचे उद्घाटन व हस्तांतरण कार्यक्रम प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत प्रशालेच्या प्रांगणात पार पडला.

खोपोली पेण रोड परिसरातील पालकांना आपल्या पाल्यांना खोपोली किंवा पेण शहरात विद्यार्थ्यांना इंग्रजी

माध्यमाच्या शाळेत पाठवावे लागत आहे. यासाठी त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होत होते. या छत्तीशी परिसरात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची गरज लक्षात घेऊन गोदरेज कंपनीने आपल्या सी एस आर कार्यक्रमांतर्गत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सहकार्याने विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल ची उभारणी केली आहे. हे स्कूल या परिसरातील सुसज्ज आणि सर्व सोयीने युक्त असे बनवण्यात आले आहे. स्टेट बोर्ड इंग्लिश मीडियम पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक वर्ग करण्यात आले आहेत. या प्रशालेत सुमारे २०० पेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून यापुढे या भागाची भविष्यातील वाढ आणि औद्योगीकरण वाढत असल्याकारणाने इकडे चांगल्या सी बी एस सी अभ्यासक्रमाची सुरुवात करण्याचा मानस स्वामी विवेकानंद संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. गोदरेजच्या सीएसआर च्या वतीने या प्रशालेत चार प्रशस्त खोल्या बेंच व सर्व फर्निचर पेंटिंग आणि गार्डन खेळाचे साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या नूतन इमारतीचे उद्घाटन गोदरेज कंपनीच्या सीएसआर प्रमुख अश्विनी देव देशमुख आणि अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. साळुंखे यांनी गोदरेजच्या कामाचे कौतुक केले व भविष्यातही श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था व गोदरेज एकत्रितपणे काम करेल असा विश्वास व्यक्त केला. सत्यशील चारित्र्य नैतिकता या मूल्यांची आठवण करीत विद्यार्थ्यांना चारित्र्यसंपन्न जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले. प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य एम एम शेरखाने यांनी केले. याप्रसंगी खालापूर तालुक्याचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी संस्थेला प्रशासनाची सदैव मदत राहील अशी हमी दिली व श्री छत्रपती संकुलातील शिक्षकांचे कौतुक केले. गोदरेजच्या वतीने राजेंद्र पाशिलकर, मधुसूदन मिस्त्री, कैजाद करंजावाला, विनय भगोरिया, रमेश भांडारकर, वशिष्ठ सिंग, प्रफुल्ल मोरे, आरती भांबोरे, तेजश्री जोशी, तानाजी चव्हाण उपस्थित होते. पी एल हाके, एस आर बेडगे, संजय महाजन, एस एस पाटील, एस एम मोरे, व्ही ए ठाकरे, स्वप्नाली जाधव, सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रशांत शेळके व प्रा. दीक्षा पेरवी यांनी केले तर तानाजी चव्हाण यांच्या आभाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

शब्दकोडे क्र.३२



आडवे शब्द: १. जिकडे वाट दिसेल त्या मार्गाने वेडया सारखे पळत सुटणे, ४. तांदळाची एक उच्च जात, ७. देऊळ, राऊळ, ९. व्याधी, आजार, ११. अंगावरील बारीक केस, १२. आयुष्य, १३. कोमट, उष्ण, गार नसलेले, १६. नाम, होडी, १७. मदीरा, मदय, १८. इंग्रजीत बंदुक, २०. आंब्याची बी, २१. धोबी, परीट, २२. राजदरबारातील एक शिपाई जसा चोपदार, २३. पुरावा, २५. कुंभाराची भट्टी, २६. वंश, कुळ, २८. ऐवज, द्रवसंख्या, २९. लहान मुल, बालक, ३०. शिवसेनेचा सभासद, ३३. एक जलचर प्राणी, ३४. प्रवासाचा टप्पा, ३६. टरफलासहीत तांदुळ, ३७. नेहमी हसत राहणारा, ४०. वस्तु, जिन्नस, पर्वत, ४१.'-- मीन तीन', ४२. विमान चालवणारा, ४३. कट, कावा, ४५. धुंदी, कैफ, ४६. सासुचा नवरा, ४८. एक मसाल्यात वापरण्याचे कंद, ५०. होकार, संमती असणे, ५१. रजनी, निशा, ५२. बाजरीची पोळी, ५४. शिकार, पारध, ५६. नागाच्या डोक्यावरील काल्पनीक मणी, ५८. एक मोठा व सुस्त साप, ६१. पथ, रस्ता, ६२. शिक्षा, शासन, ६४. मर्त्य, ६५. मान्यता, परवानगी, ६६. बाण, शर, ६७. दाबुन टाकणे, दमन करणे, ६८. वस्तु, जिन्नस, ६९. कर्म, काज, ७०. मृदू, मऊ, ७१. साक्षर नसलेला, ज्याला लिहीता वाचता येत नाही असा, ७४. उंटाच्या पाठीवरील उंचवटा, ७५. पदार्थाचा अगदी सुक्ष्म अंश, ७६. सापाने टाकलेली त्वचा, ७७. नागाच्या चाली सारखी असलेली, ८१. 'हम तुम्हारे है ---' एक हिंदी चित्रपट, ८३. आकाशात संचार करणारे एक यान, ८४. गर्भवती, ८५. गोदाम, वखार

उभे शब्द : १.ढिले, घट्ट नसलेले, २. नावानंतर लावायची एक उपाधी, ३. राजीव, ४. नबा उलटे करा, ५. गर्विस्ट, अभिमानी, ६. काठ, किनारा, ८. दिपक, १०. गाजावाजा, बोभाटा, १४. नंतर, काही वेळाने, १५. आठवण, याद, १६. वास घेण्याचे इंद्रीय, १७. मोठ्या भावाला मारावयाची हाक, १९. शहर, मोठे गाव, २०. आमसुल किंवा त्याचे झाड, २१. लक्ष्मी-विष्णु, २२. शिजवलेले तांदुळ, २४. कबर असलेली इमारत, २५. दर्पण,चेहरा बघण्याची काच, २६. अग्नि,ज्वाला, २७. नुकसान, तोटा, २९. शिल्लक, ३०. तोंटातुन विशीस्ट प्रकारे हवा फुंकल्यानंतर निघणारा आवाज, शिट्टी, ३१. वाट दिसेल तिकडे काहीही न पाहता पळत सुटणे, ३२. कथा, ३५. विश्व, ३६. लहान, छोटा, ३८. संपुर्ण, सर्व, ३९. मासा, एक रास, ४१. एक उपदीशा, ४३. ऐकण्याचे इंद्रीय, कर्ण, ४४. त्याच ठिकाणचा राहणारा, ४५. मुसलमानी प्रार्थना, ४७. सोबतच जाणे किंवा प्रस्थान करणे, ४९. आराम, विश्राम, ५१.राजाची पत्नी, ५२.ओझे, बोजा, ५३. लक्ष्मी-विष्णु, ५५. तोरा, ऐट, वडाचे झाड, ५७. थकवा, ग्लानी, ५८.गंगा-यमुना-सरस्वती या तिन्ही नदयांचा संगम या शहराजवळ झालेला आपल्याला दिसतो, ५९. बस्तान, ६०.चाल, वेग, ६२. प्रवासाचे वर्णन करणे, ६३. माहीत, ज्ञात, ६५. कामासह, ६६. धनुष्यबाण, ६७. सावध, सजग, ७१. निवाडा, निर्णय, ७२. धुंद, मग्न, ७३.'ओम -- शिवाय' एक शिव मंत्र, ७८. इंग्रजीत बंदुक, ७९. शैक्षणीक पदवी इंग्रजीत, ८०. एक सरपटणारा जहरी प्राणी, ८२. नाही म्हणणे, नकार.

शब्दकोडे क्र.३१ चे उत्तर

आडवे उत्तर
१. सैरावैरा ४. बासमती ७. मंदीर ९. रोग ११. लव १२. जीवन १६. नाव १७. दारू १८. गन २०. कोय २१. रजक २२. भालदार २३. गमक २५. आवा २६. रकम २९. बाळ ३०. शिवसैनिक ३३. मासा ३४. मजल ३६. साळ ३७.हासरा ४०.नग ४१.ईन ४२.वैमानिक ४३.कारस्थान ४५.नशा ४६.सासरा ४८.लसुण ५०.मान्यता ५१.रात्र ५२.भाकर ५४.सावज ५६.नागमणी ५८.अजगर ६१.वाट ६२.सजा ६४.मर ६५.तीर ६७.दफन ६८.नग ६९.काम ७०.नरम ७१.निरक्षर ७४.मदार ७५.कण ७६.कात ७७.नागमोडी ८१.सनम ८३.विमान ८४.गरोदर ८५.कोठार

उभे उत्तर
१.सैल २.राव ३.राजीव ४.बान ५.मगरूय ६.तीर ८.दिवा १०.गवगवा १४.मग १५.सय १६.नाक १७.दादा १९.नगर २०.कोकम २१.रमारमन २२.भात २४.मकबरा २५.आरसा २६.जाळ २७.हानी २९.बाकी ३०.शिळ ३१.सैरावैरा ३२.कहाणी ३५.जग ३६.सान ३८.सकल ३९.मीन ४१.ईशान्य ४३.कान ४४.स्थानीक ४५.नमाज ४७.सहगमन ४९.विसावा ५१.राणी ५२.भार ५३.रमारमण ५५.वट ५७.मरगळ ५८.अहमदाबाद ५९.जम ६०.गती ६२.सफरनामा ६३.जान ६५.सकाम ६६.तीरकमठा ६७.दक्ष ७१.निकाल ७२.रत ७३.नमो ७८.गन ७९.डीग्री ८०.नाग ८२.नको

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचा दावा

भविष्यातील वाटचालीसाठी अर्थसंकल्प उपयुक्त

। मुंबई । प्रतिनिधी । केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा भविष्यातील काही चांगल्या वाटचालीसाठी उपयुक्त ठरणारा आहे. असा दावा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांनी व्यक्त केला आहे.

देशाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्यावतीने अर्थसंकल्प विश्लेषणाचे हे व्याख्यान दरवर्षी आयोजित केले जाते. डॉ. जाधव गेल्या आठ वर्षांपासून या विश्लेषणाचे सादरीकरण करीत आहेत. स्मारकातील मादाम कामा सभागृहात झालेल्या या विश्लेषणाच्या कार्यक्रमासाठी स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष प्रवीण दीक्षित, कोषाध्यक्ष मंजिरी मराठे, कार्यवाह राजेंद्र वराडकर, सहकार्यवाह स्वप्नील सावरकर यांच्यासह

अनेक मान्यवर उपस्थित होते.

न्यू एज या आपल्या संकल्पनेलाही अर्थसंकल्पात आपल्या संज्ञेसह घेतले आहे, त्यामुळे शिक्षण क्षेत्रामधील महत्त्वाच्या बदलांवर अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतूदही महत्त्वाची ठरणारी आहे, असा विश्वास जाधव यांनी व्यक्त केला. अर्थसंकल्पाबरोबरच विविध आर्थिक आणि देशाच्या संबंधातील विषयांनाही डॉ. जाधव यांनी लोकांपर्यंत सादर केले. आयकराच्या रचनेतले बदल खूप अपेक्षित होते. आयकर मर्यादा वाढवावी अशी सर्वसामान्यांची अपेक्षा पूर्वी होती, त्याबद्दल आपण गेल्या दोन-तीन वर्षांपासून सांगतही आहोत. आता ती दिली आहे. ७ लाख रुपये वार्षिक उत्पन्न ज्यांचे असेल त्यांना काहीही कर द्यावा लागणार नाही ही तरतूद दिलासाजनक आहे. मात्र, यामध्ये खरा फायदा होणार आहे तो वरच्या श्रेणीतील करदात्यांना. कर दरांमध्ये सर्वांत मोठी कपात आहे ती सर्वांत मोठ्या टॅक्स ब्रॅकेटसाठी. ज्यांचे वार्षिक उत्पन्न ३० लाखापेक्षा जास्त आहे ज्यामध्ये कोट्यधीश-अब्जाधीश आले. वास्तविक पाहता त्यांना करकपातीचा फायदा जास्त मिळणार आहे. मात्र याचा अर्थ खूप वाढलेली आर्थिक विषमता कमी व्हायला मदत होईल, हे संभवत नाही, असेही मत डॉ. जाधव यांनी नोंदवले.

निवडक

प्रवीण पुरो यांची निवड

चिरनेर : उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे ज्येष्ठ पत्रकार तथा सल्लागार प्रवीण पुरो यांची मंत्रालय व विधिमंडळाच्या वार्ताहर संघाच्या सरचिटणीसपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचा उरण येथे संघाचे पत्रकार प्रदीप पाटील यांच्या हस्ते गुलाबाचे रोपटे व शाल देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उरण तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रवीण पुरो यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

वधू-वर सूचक मेळावा

अलिबाग : पनवेल-उरण आगरी समाज मंडळ, पनवेल यांच्यामार्फत रविवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी सकाळी १२ वाजता आगरी समाज हॉल, पनवेल येथे वधू-वर सूचक मेळाव्याचे आयोजन केले आहे. सदर मेळाव्यासाठीची नोंदणी सुरू असल्याचे मंडळाचे पदाधिकारी बी.पी. म्हात्रे व विजय गायकर यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ०२२-२७४५६२७८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

कामगाराचा दुदैवी मृत्यू

पनवेल : तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या लहास इको प्रा.लि. कंपनीमध्ये शडरमध्ये मशीन चालविण्याचे काम करीत असताना सुधीरकुमार सिंग (३२) हा मशीनची चैन लावायला गेला असता त्याच्या अंगावर मशीन कोसळून त्यात तो गंभीररित्या जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, या अपघाताबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

नियम मोडणाऱ्यांना तंबी

पनवेल : नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या इको व्हॅन चालकांवर खारघर वाहतूक शाखेने कारवाई करीत त्याच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. खारघर वाहतूकचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक योगेश गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पन्नास चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. यापुढे मनमानी, दादागिरी व बेशिस्त वर्तन बिलकुल खपवून घेण्यात येणार नाही अशी सक्त ताकीद त्यांना गावडे यांनी दिली आहे.

कामगारांचा मेळावा

पनवेल : पनवेल शहर गटई कामगार युनियन संत श्रेष्ठ रोहिदास महाराज यांच्या ६६४ व्या जयंतीनिमित्त संत रोहिदास महाराज जयंती व उलवे रोड येथील गटई कामगारांचा मेळावा उत्साहात पार पडला. पनवेलमधील उद्योजक आणि स्थानिक राजकीय नेते रवीशेठ पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गटई कामगार युनियनचे अध्यक्ष माजी नगरसेवक रायगड भूषण डॉ. शिवदास कांबळेच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला.

स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी आग्रही

। पेण । वार्ताहर ।
महसूल विभागाच्या पेण ग्रामीणमध्ये मोडणाऱ्या आणि तात्पुरत्या बोरगाव ग्रामपंचायतीमध्ये जोडलेल्या तांबडी, उंबरमाळ, खौसा, काजुचीवाडी, केळीचीवाडी या पाच आदिवासीवाडीतील ग्रामस्थ स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी आग्रही असून, तसा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला. जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील यांच्या आदेशानुसार विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामस्थांकडून ग्रामसभेमध्ये ठराव मंजूर

या ग्रामसभेत आदिवासींच्या स्वतंत्र ग्रामपंचायत, पिण्याचे पाणी योजना, रस्ते, वीज जोडणी, वनहक्क दावे याबाबत सविस्तर चर्चा घडवून विविध ठराव पास केल्याची माहिती बोरगाव ग्रुप ग्रामपंचायत सरपंच सुधीर पाटील यांनी दिली. याबाबत बोलताना ते म्हणाले की, शासनाच्या स्वतंत्र ग्रामपंचायत बनवण्याच्या निकषांमध्ये कमी लोकसंख्येमुळे प्रस्ताव देण्यास अडचणी निर्माण होत असली तरी विशेष बाब म्हणून सदर प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

सदर ग्रामसभेत पाचही आदिवासीं वाड्यांवरुन आदिवासी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. आदिवासींना भेडसावणाऱ्या प्रश्नावर सुनिल वाघमारे, काळ्या कडू, सोमा खाकर, नीलम वाघमारे यांनी विविध ठराव मांडून चर्चा केली. यावेळेस पेण पं. समितीचे ग्रामविस्तार अधिकारी प्रसाद म्हात्रे, आदिवासी विकास प्रकल्प विभागाचे निरीक्षक श्री. भानुशाली, ग्रामसेवक गणेश पाटील, वनरक्षक निलेश वार्डे, प्रियंका साप्ते, कृषी सहायक अनंत पाटील, उपसरपंच मधुरा महाडिक व अंकुर ट्रस्ट, ग्रामस्वराज समिती या संस्थांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळेस वनहक्क मान्यता कायदा व त्यामधील तरतुदीबाबत सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी चित्रफित दाखवून सामूहिक व वैयक्तिक वनहक्क दाव्याच्या प्रलंबित समस्येवर मार्गदर्शन केले. तसेच राजेंद्र पाटील (दुश्मी) यांनी जनजीवन मिशन योजनेविषयी पारदर्शक कारभार करण्याची मागणी केली.

अंडरपासला कंटेनरची धडक

रिक्षातील प्रवासी थोडक्यात बचावले

। उरण । वार्ताहर ।

धुतूम ग्रामपंचायत हद्दीतील एनएच ४ या रस्त्यावरील अंडरपासला कंटेनर धडकल्याची घटना शनिवारी (दि. ४) सायंकाळी सातच्या सुमारास घडली. या अपघात अंडरपासमधून प्रवास करणारे रिक्षामधील प्रवासी थोडक्यात बचावले आहेत.

जेएनपीटी बंदर प्रशासनाने करोडो रुपये खर्चून जेएनपीटी बंदर ते धुतूम मार्गे पळस्पे या आठपदरी कॉरिडॉर रस्त्याची उभारणी ही नॅशनल हायवे इंडिया ॲथोरिटीच्या माध्यमातून केली आहे. परंतु, जेएनपीटी बंदर प्रशासनाने व नॅशनल हायवे इंडिया ॲथोरिटीच्या अधिकारी वर्गाने या परिसरातील बाधित प्रकल्पग्रस्त, गावकऱ्यांना विश्वासात न घेता गाव परिसरात सर्व्हिस रोडला जोडणाऱ्या एनएच ४ बी रस्त्यावर अंडरपासची उभारणी केली आहे. त्यामुळे अंडरपासमधून प्रवास करणाऱ्या अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे वारंवार अपघाताची संख्या बळावली आहे.

सर्व्हिस रस्त्यावरील बेकायदा पार्किंग व अंडरपासजवळील वारंवार घडणाऱ्या अपघातासंदर्भात गावकऱ्यांनी जेएनपीटी बंदर व नॅशनल हायवे इंडिया ॲथोरिटीकडे वारंवार आवाज उठवला आहे. परंतु, संबंधित प्रशासनाच्या अधिकारी वर्गाने कंटेनर ट्रेलर मालक, संघटनांकडून आर्थिक हितसंबंध जोपासत वारंवार घडणाऱ्या घटनांकडे काणाडोळा केला आहे. त्यामुळेच अपघात होण्याची दुर्दैवी घटना पुन्हा एकदा घडली आहे.

पौष्टिक तृणधान्य दिनानिमित्त शेतकरी मेळावा

। नेरळ । प्रतिनिधी ।

सन २०१३ पौष्टिक तृणधान्य वर्षे म्हणून जाहीर केले आहे. पावसात ज्वारी, बाजरी, नाचणी वरई या तृणधान्य पिकांचे क्षेत्र वाढवण्याबरोबरच या पिकाचे आहारातील महत्त्व जाणून घेऊन स्वास्थ्यविषयक आहारात समावेश केला आहे. त्याची जनजागृती कृषी विभाग करीत असून, कर्जत तालुक्यातील शेलू येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शेलू गावातील ग्रामपंचायत कार्यालय येथे आयोजित केलेल्या कर्याक्रमात शेलू ग्रामपंच्यातीचे सरपंच शिवाजी खारीक, भाऊ भोईर, ग्रामपंचायत सदस्यता बूधी दरवडा, चित्रा कोंडिलकर, ग्राम बचत गट समन्वयक रेखा हिरेमठ यांच्यासह अक्षय हिसलगे, माजी उपसरपंच महेश शेकटे, दुर्वास सोनावले आदी उपस्थित होते.

यावेळी कृषी पर्यवेक्षक मंगेश गलांडे यांनी पौष्टिक आहाराचे महत्त्व सांगत तृणधान्य यांच्यापासून तयार झालेला पौस्टिक आहार सर्वांनी ही आजच्या काळाची गरज आहे असे स्पष्ट केले.

तर कृषी पर्यवेक्षक सचिन केने यांनी कोव्हिडनंतर सर्वांची रोगप्रतिकारक शक्ती कमी झाली आहे. त्यामुळे आपण आपली पारंपरिक पीक कमी करून भात आणि गहू यांवर जास्त सर्वाधिक अवलंबून राहतो असे स्पष्ट करीत आपली रोगकारक शक्ती वाढविण्यासाठी सर्वांनी पौष्टिक प्रधान्य, ज्वारी, बाजरी, नाचणी, वर पिकांचा अन्नात वापर वाढवावा असे आवाहन केले.

जयेश चोडणेकर यांचा तहसीलदारांकडून सन्मान

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

१३वा राष्ट्रीय मतदार दिन स्पर्धा २०२३ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी जयेश चोडणेकर यांनी शहरातील वॉर्डात जाऊन नागरिकांना राष्ट्रीय मतदार दिवसाचे महत्त्व पटवून देत जनजागृती केली. त्यांच्या कार्याची दखल घेत तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, १८ वर्षे पूर्ण केलेल्या मतदारांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे व मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन भारतीय लोकशाही प्रबळ व भक्कम करावी, यासाठी त्यांनी वॉर्डा-वॉर्डात जाऊन जनजागृती केली. या सत्काराप्रसंगी निवडणूक नायब तहसीलदार अमित पुरी, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

'नेरळचे वातावरण आल्हाददायक'

। नेरळ । प्रतिनिधी ।

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई महानगराचा विस्तार नेरळ आणि कर्जतपर्यंत वाढला आहे. त्यात माथेरानसारख्या जगप्रसिद्ध पर्यटन स्थळाच्या पायथ्याशी असलेले नेरळ परिसराचा हा प्रदूषणमुक्त परिसर आहे. त्यामुळे या आल्हाददायक वातावरणात मी स्वतः हरपून गेले आहे आणि त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांना नेरळमध्ये घर घेण्यासाठी आणणार, असा शब्द हास्य अभिनेत्री शिवाली परब उपस्थित होत्या. नेरळ येथील हावरे मिडोज या गृहप्रकल्पाच्या लोकार्पणप्रसंगी त्या बोलत होत्या.

हावरे बिल्डर्स कडून नेरळजवळ एक गृहप्रकल्प साकारला गेला असून, या प्रकल्पाच्या लोकार्पणप्रसंगी हास्य अभिनेत्री शिवाली परब या उपस्थितीत होत्या. त्यावेळी बोलताना शिवाली परब यांनी नेरळ परिसराचे कौतुक केले. नेरळ मेला निमित्त आयोजित सोहळ्यात हावरे मिडोज प्रकलपाचे लोकार्पण करण्यात आले. त्यावेळी त्या गृह प्रकल्पातील कुटुंबांना चावी देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी हावरे बिल्डर्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिकेत हावरे, चेअरमन संजय हावरे, एसबीआय बँक आणि स्वामीह फंडचे मुख्य गुंतवणूक अधिकारी इरफान काझी, प्रमुख गुंतवणूक अधिकारी निखिल केजरीवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी; कारवाईची प्रवाशांकडून मागणी

। पनवेल । वार्ताहर ।

पनवेल तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक शहरात खरेदीसाठी येत असल्याने पनवेल शहरातील उरण नाका बाजार परिसरात मोठी गर्दी होत आहे. मात्र, गेल्या दोन दिवस वडघर पुलाजवळ एकतर मोठमोठे खड्डे, तर दुसरीकडे नव्याने सुरु झालेला रायगड वडापाव दुकानाबरोबर इतर दुकानांच्या अतिक्रमाणामुळे वाहतूक कोंडी होत असल्याचे प्रवाशाचे म्हणणे आहे. त्यामुळे सदर दुकान चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

पनवेल परिसरातील उरण नाक्यावर वाहतूक कोंडी ही नित्याचीच आहे. त्याचबरोबर वडघर परिसरात गाढी नदीच्या पुढे नव्याने सुरु झालेल्या रायगड वडापाव दुकानासह इतर दुकानदारांनी आपले बस्तान रस्त्यावर मांडले असल्याकारणाने वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे सिडको, ग्रामपंचायत, आणि वाहतूक पोलिसांनी लवकरात लवकर मार्ग काढून उपाययोजना करावे, अशी मागणी येथील नागरिक व प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी कृषी महोत्सवाचा लाभ घ्यावा : भुजबळ

। कोर्लई । वार्ताहर ।

महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग अंतर्गत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा रायगड यांच्या वतीने दि.९ ते दि.१३ फेब्रुवारी या कालावधीत पनवेल-कामोठे येथील सेक्टर २७ मधे रायगड जिल्हा कृषी महोत्सव -२०२३ चे आयोजन करण्यात आले असून, नागरिक व शेतकऱ्यांनी आवर्जून भेट देऊन या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुरुड तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी केले आहे.

शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजना/ उपक्रमाची माहिती, कृषी तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण प्रगतशील शेतकऱ्यांचे अनुभव, बाजारपेठ व्यवस्थापन, कृषी पूरक व्यवसाय, इत्यादी बाबतचे मार्गदर्शन उपलब्ध व्हावे. कृषी प्रदर्शन, कृषी विषयक परिसंवाद आणि अनुभवी शेतकरी उद्योजकांची व्याख्याने, यशस्वी शेतकरी, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व विचारवंत यांची भेट घडावी व सामान्य शेतकऱ्यांना शंका निरसन करून घेता यावे व उत्पादन ते ग्राहक थेट विक्री या संकल्पनेवर आधारीत धान्य व खाद्य महोत्सव फळे-फुले व भाजीपाला महोत्सव इत्यादीचे आयोजन करण्यासाठी रायगड जिल्ह्यात दरवर्षी कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे यंदा रायगड जिल्हा कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले, असून सदरच्या कृषी महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी कृषी महोत्सवाला नागरिकांनी व शेतकऱ्यांनी आवर्जून भेट देण्याचे आवाहन मनीषा भुजबळ यांनी केले आहे.

विजेच्या तारा तुटल्याने आग

। खोपोली । प्रतिनिधी ।

नगरपालिका हद्दीतील वासरंग तांबडी वसाहतीच्या एका घराच्या छपरावर महावितरणच्या उच्च दाबाच्या विद्युत वाहिनी तुटल्याने त्यातून उडालेल्या ठिणगीने घरावर आच्छादन केलेल्या प्लास्टिक पेपरला अचानक आग लागल्याने रहिवाशांची एकच धांदल उडाली. वसाहतीमधील काही तरुणांनी छपरावर चढून तात्काळ आग आटोक्यात आणल्याने पुढील गंभीर प्रसंग टळला. खोपोली अग्निशामक दलाचे जवानही माहिती समजल्यावर घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी आग विझवण्याचा प्रयत्न केला अन्यथा संपूर्ण वसाहटीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असते.

गुरुवारी पहाटेच्या वेळेला सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्याने या विद्युत तारा तुटल्याचे सांगण्यात येते. या घटनेबाबत काही अंतरावर निवासस्थान असणाऱ्या माजी नगरसेवक मोहन अवसरमल यांनी तात्काळ महावितरण अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून माहिती दिल्यानंतर या परिसरातील सहाय्यक अभियंता गालांडे व त्यांच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत दुरुस्ती करण्याचे काम युद्धपातळीवर केले. अशा प्रकारच्या घटना दोन-तीन वेळा झाल्याचे स्थानिक रहिवाशांनी ही बाब प्रस्तुत प्रतिनिधीशी बोलताना सांगितली, वारंवार घडणाऱ्या या घटनेमुळे येथील रहिवासी भीतीच्या छायेत दिसून आले.

दरम्यान या संदर्भात सहाय्यक अभियंता गलांडे यांची भेट घेतली असता, सदरची घटना नऊ तीस नंतर घडली आहे, मात्र सकाळी सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे आम्ही विद्युत पुरवठा सकाळी आठच्या दरम्यानच बंद केला असल्याने सदरची आग विद्युत तारांमुळे लागल्याचा आरोप त्यांनी फेटाळला आहे.

घरावरील प्लॉस्टिक जळून खाक

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री.सिद्धीविनायक ज्योतिष, सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं.९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- Tally A/c साठी अनुभवी लेडीज पाहिजे मांडवा झिराड पगार १२०००/१५०००/- mob 8007893232
- घर, कॉटेज, बंगलो पर्यटन व्यवसायासाठी भाड्याने पाहिजे. ७८७५५८७०८४

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

मॉर्निंग वॉक ग्रुपचा वर्धापनदिन सोहळा

पंडित पाटील यांना दक्ष मार्गदर्शक पुरस्कार

शेकाप महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील, डॉ. शिवपाल तिवारी यांची उपस्थिती

। अलिबाग । प्रतिनिधी ।
रायगड जिल्ह्यात मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीची चांगली प्रसिद्धी आहे. या मॉर्निंग वॉक ग्रुपमुळे आरोग्याचे संवर्धन संवर्धन होते, असे कौतुगोद्गार माजी आमदार पंडित पाटील यांनी ग्रुपच्या वर्धापनदिनी काढले. त्यांना यावेळी दक्ष मार्गदर्शक पुरस्काराने मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

आंबेपूर-पेझारी येथील उपक्रमशील मॉर्निंग वॉक ग्रुपचा दहावा वर्धापन दिन सोहळा शुक्रवार, ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष (प्रभारी) प्रकाश धुमाळ, राजिपच्या माजी सदस्य भावना पाटील, पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, उद्योजक सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमन पाटील, लिलाधर धुमाळ, राजाभाऊ हळदवणेकर, साहित्यिक-पत्रकार उमाजी केळुसकर, निलेश थोरे-पाटील, मॉर्निंग वॉक ग्रुप, आंबेपूर-पेझारीचे अध्यक्ष प्रकाश नागू म्हात्रे, उपाध्यक्ष अनिल पाटील, कार्याध्यक्ष मोहन मंचुके व सचिव जी.सी. पाटील, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शिवपाल तिवारी यांची उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते माजी आमदार पंडित पाटील यांचा दक्ष मार्गदर्शक पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. शिवपाल तिवारी यांनी आपल्या भाषणातून आरोग्य संवर्धनाबाबत मार्गदर्शन केले. तसेच चित्रलेखा पाटील यांनीही मार्निंग वॉक ग्रुपच्या आपण पाठीमागे असल्याचे सांगितले.

याप्रसंगी चित्रलेखा पाटील यांना सावित्रीची लेक पुरस्कार, भावना पाटील यांना आंबेपूर भूषण पुरस्कार, सवाई पाटील यांना नवउद्योजक पुरस्कार, सुमन पाटील यांना आंबेपूर नवचैतन्य पुरस्कार, उमाजी केळुसकर यांना पत्रकार भूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यानंतर ज्ञान तपस्वी पुरस्काराने खेळुराम भोईर, हास्यविनोद पुरस्काराने पांडुरंग पाटील, सेवाभावी पुरस्कारने सुरेश पाटील, गुरुमाऊली पुरस्काराने अनिल पाटील, दिलखुलास पुरस्काराने राजाराम धुमाळ, शांततप्रेमी पुरस्काराने कमळाकर पाटील, मनोरंजन गुणगौरव पुरस्काराने सहदेव पाटील, काव्यरंजन पुरस्काराने रामचंद्र म्हात्रे यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.सी. पाटील यांनी, संस्थेच्या अध्यक्षांचे मनोगत प्रकाश म्हात्रे यांनी, सूत्रसंचालन रामचंद्र म्हात्रे यांनी तर आभार सुनील राऊत यांनी मानले.

उद्घाटनाविनाच 'रयत'ची माध्यमिक शाळा सुरू

एम्पॅथी फाऊंडेशनकडून शाळेसाठी एक कोटींचा निधी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।
एसटी स्थानक पोलादपूरच्या लगतच्या रयत शिक्षण संस्था सातारा संचालित विद्यामंदिर पोलादपूरची जुनी इमारत मोडकळीस आल्यानंतर या इमारतीमधील विद्यामंदिर प्रशाला आता पूर्णपणे पोलादपूरचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ देवस्थानलगत स्थलांतरीत करण्यात आली आहे. याठिकाणी एम्पॅथी फाऊंडेशनच्या एक कोटी रूपये खर्चाच्या इमारतीत उद्घाटन न करताच रयत शिक्षण संस्थेची शाळा सुरू झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

१ जानेवारी २०१९ रोजी पोलादपूर येथे येऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस माजी मंत्री सुनील तटकरे यांनी ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी दानशूर व्यक्तींसोबत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची चर्चा सुरू असताना केवळ तिथे होतो म्हणून रायगड जिल्ह्यातील एका शाळेसाठी मदत मिळण्याची आग्रही भूमिका घेतल्याने तातडीने पोलादपूर विद्यामंदिराला एक कोटीचा लाभ उपलब्ध होऊन याठिकाणी किमान कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमांद्वारे शैक्षणिक विकास साध्य करता येईल, असा विश्वास व्यक्त केला होता.

यावेळी माजी मंत्री सुनील तटकरे यांनी, विद्यामंदिर पोलादपूरकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणादरम्यान ओव्हरब्रिजची असलेली गरज पूर्ण करण्यासाठी शरद पवार

आणि केंद्रीय भूपुष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट होईल, त्यावेळी उपस्थित राहून आवश्यक तो पाठपुरावा करू, अशी ग्वाही दिली होती.

पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात आल्यानंतर चौपदरीकरणामध्ये विद्यामंदिरच्या १३ वर्गखोल्यांची मोडतोड मोठ्या प्रमाणावर झाली. याचदरम्यान एम्पॅथी फाऊंडेशनचे सीईओ एम.आर. सुंदरेश्वरन यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीकाळभैरवनाथ देवस्थानालगतच्या रयत विद्यामंदिराच्या इमारतीमध्ये नियोजित इमारतीचे संकल्पनाचित्र कसे असावे, याबाबत निश्चिती करण्यात आली. याप्रसंगी रयतचे विभागीय निरिक्षक मोहिते, गव्हर्निंग बॉडी मेंबर निवास शेठ, मुख्याध्यापक केंगारे व ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्या हस्ते एम्पॅथी फाऊंडेशनचे सीईओ एम.आर. सुंदरेश्वरन यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला होता.

मात्र, यानंतर प्रत्यक्षात भूमिपूजन होऊन तीन वर्षांमध्ये तळमजल्यावर दोन मजले असलेली सुसज्ज इमारत उभी राहिली आणि यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून या नवीन इमारतीमध्ये शैक्षणिक वर्ग सुरूदेखील झाले. संस्थेने नवीन इमारतीच्या आधारे जुन्या इमारतीमधील १३ वर्गखोल्यांची उणीव भरून काढली. दरम्यान, ज्या माजी मंत्री सुनील तटकरे यांनी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. शरद पवार यांच्याकडून १ कोटी रूपये निधीचा पाठपुरावा केला; ते रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदारदेखील झाले. पण या नवीन इमारतीचे अधिकृतपणे उद्घाटन करण्याकडे स्थानिक शाळा समितीचे दुर्लक्ष झाले आहे.

पोलादपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिरामध्ये इंग्रजी माध्यमाची ज्युनियर के.जी. व के.जी. शाळा, माध्यमिक शाळा तसेच विज्ञान वाणिज्य आणि कला शाखेच्या कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग भरत असून, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खा. पवार यांच्या माध्यमातून विद्यमान खा. तटकरे यांचे अधिक सहकार्य मिळविण्यासाठी लवकरात लवकर या नवीन इमारतीचे उद्घाटन करून अधिकृतपणे इमारतीचा वापर करण्यासंदर्भात तालुक्यात चर्चा होऊ लागली आहे.

मनसेचे आंदोलन तूर्तास स्थगित

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील रस्त्यावर रोज वाहतूक कोंडी होत असल्याने, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दखल घेत या वाहतूक कोंडीला जबाबदार गोडाऊनचे गेट बंद करण्याचा इशारा दिला होता. त्यासंदर्भात उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल पाटील, वाहतूक नियंत्रण उरणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक गायकवाड, मनसे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, उरण तालुकाध्यक्ष सत्यवान भगत, उपतालुकाध्यक्ष मंगेश वाजेकर, विभाग अध्यक्ष संदीप ठाकूर, बबन ठाकूर आणि कंपनी व्यवस्थापन यांच्या उपस्थितीत उरण येथे बैठक संपन्न झाली. त्यामुळे आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे.

जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका अध्यक्ष सत्यवान भगत, यांनी वाहतूक कोंडी

बाबत आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यामुळे या वाहतूक कोंडीला जबाबदार असणाऱ्या त्या त्या परिसरातील सीएफएसमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना गेट बंद आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला होता.

वाहतूक कोंडी मुळे ४ ते ५ तास वाहने उभी असल्याने सर्वसामान्य जनतेला सणाच्या दिवशी रोज वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात उरण तालुकाध्यक्ष सत्यवान भगत व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाने वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील पाटील, उरणचे तहसिलदार तथा दंडाधिकारी भाऊसाहेब अंधारे यांच्यासोबत चर्चा करून शासकीय नियमांची पायमल्ली करणाऱ्या मुजोर कंपनी व्यवस्थापनावर गुन्हा नोंदवून कारवाई करण्यात यावी यासाठी निवेदनही दिले होते. त्यासंदर्भात गुरुवारी चर्चा होऊन आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे.

विद्यार्थ्यांना एसएससी परीक्षापूर्व मार्गदर्शन

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

सुधागड एज्युकेशन सोसायटीचे माध्यमिक विद्यालय वांगणी व रोहा तालुका गणित विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षापूर्व मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले. या शिबिराचा परिसरातील वांगणी हायस्कूल, ऐनघर हायस्कूल व वेलशेत हायस्कूल या माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते मंगेश जाधव यांनी केले. यावेळी वांगणी हायस्कूलचे मुख्याध्यापक जयहिंद ठाकूर, ऐनघर हायस्कूलचे मुख्याध्यापक अनिल वाघ, वेलशेत हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेंद्र हडकर, रोहा तालुका गणित विज्ञान मंडळाचे अध्यक्ष टिळक खाडे, शिक्षक

भगवान म्हात्रे, रायगडभूषण वसंत भोसले, माजी विद्यार्थी जगन दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरामध्ये अलिबाग येथील तज्ज्ञ मार्गदर्शक ॲड. के.डी. पाटील यांनी मराठी, विपिन राऊत यांनी हिंदी, शैलेश घोसाळकर यांनी इंग्रजी व समाजशास्त्र, अतुल तुपे यांनी विज्ञान, अनिकेत कारेकर यांनी गणित विषयाचे उत्कृष्ट असे मार्गदर्शन केले. शिबिराच्या शेवटी तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रोहा तालुका गणित विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष टिळक खाडे यांनी केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी वांगणी हायस्कूलचे प्रयोगशाळा परिचर संदीप भोसले व शाळेतील इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम केले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व तज्ज्ञ मार्गदर्शकांना सन्मानपत्र देऊन संयोजकांतर्फे गौरविण्यात आले. तर, कोकण एज्युकेशन सोसायटीचे सेवानिवृत्त कलाध्यापक भास्कर सोलेगावकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

'आयएनएस विक्रांत'ची प्रतिकृती चंद्रपुरात

। पनवेल । वार्ताहर ।

ओरॉयन मॉलने प्रायोजित केलेली आणि संस्कार भारतीच्या संकल्पनेतून साकारलेली आयएनएस विक्रांत या भारतीय युद्धनौकेची प्रतिकृती मंत्रालयातील प्रदर्शनानंतर चंद्रपुरातील विसापूर येथील बॉटनिकल गार्डनमध्ये स्थापित करण्यात येणार आहे. राज्याचे वन, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विनंतीनुसार संस्कार भारती आणि ओरायन मॉलने आयएनएस विक्रांतची ही प्रतिकृती विसापूर वनस्पती उद्यानास भेट देण्याचा निर्णय घेतला. याबद्दल वन, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ओरियन मॉलचे डायरेक्टर मंगेश परुळेकर यांचे आभार मानले आहे.

ओरॉयन मॉल सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन निरनिराळे प्रकल्प राबवित असतो. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पनवेलच्या ओरायन मॉल आणि संस्कार

भारतीच्या पुढाकाराने आयएनएस विक्रांतची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. भारताची पहिली युद्धनौका म्हणुन ओळख असलेल्या या युद्धनौकेच्या चलचित्रांचे प्रदर्शन देखील ओरियन मॉलमध्ये भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाला पनवेलकरांचा लाभलेला प्रतिसाद पाहून आणि राज्यभरातील विविध प्रसारमाध्यम आणि वृत्तपत्राने देखील याची दखल घेतली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राष्ट्रीय युवादिनाचे औचित्य साधून प्रदर्शनाचे उदघाटन करण्यात आले होते. आयएनएस विक्रांतची माहिती विदर्भातील जनतेपर्यंत पोहोचावी, या उदात्त हेतूने वन, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही प्रतिकृती चंद्रपूर येथील विसापूरच्या वनस्पती उद्यानात ठेवण्याचा मनोदय मंगेश परुळेकर यांच्याकडे व्यक्त केला होता. त्यांच्या विनंतीला ओरायन मॉलचे संचालक मंगेश परुळेकर, संस्कार भारतीचे दीपक करंजीकर, श्रीहरी कुलकर्णी आणि सुरेश चव्हाण यांनी तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. ओरायन मॉलच्या दातृत्वामुळे आता ही प्रतिकृती विसापूरच्या वनस्पती उद्यानात स्थापित करण्यात येणार आहे. याबाबत सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ओरियन मॉलचे डायरेक्टर मंगेश परुळेकर यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले आहे.

वाहतूक शाखेची धडक मोहीम

४१८ वाहन चालकांवर कारवाई

। पनवेल । वार्ताहर ।

नो एंट्रीत प्रवेश करणे, सीटबेल्ट, काळ्या काचा व हेल्मेट न वापरणाऱ्यांविरुद्ध पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी धडक मोहीम हाती घेतली आहे. पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी स्वतः रस्त्यावर उतरत कारवाईची धडक मोहिमेला सुरुवात केली आहे. त्याचबरोबर आगामी काळात मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती पनवेल शहर वाहतूक शाखेकडून देण्यात आली.

वास्तविक पाहता, हेल्मेट घालणे हे दुचाकीस्वाराच्या फायद्याचे आहे. यामुळे कित्येकदा अपघातात प्राण वाचतात. असे असतानाही काही दुचाकीस्वार हेल्मेट घालत नसत त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई पनवेल शहर वाहतूक शाखेने केली आहे. यावेळी नो एंट्रीत प्रवेश करणे, चारचाकी वाहनांना काळ्या काचा, सीटबेल्ट, ट्रिपल शिट, अशी धडक मोहीम राबविण्यात आली आहे.

> विना हेल्मेट, सीटबेल्ट व काळ्या काचा वापरणे अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच याबाबत जनजागृतीही करण्यात येत आहे.
>
> - संजय नाळे,
> वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल शहर वाहतुक शाखा

Change in Name
My old name Ahmedi Begum Mohmmed Shafi Humd & I have change this name to Ahmedi Mohammed Shafi Hamdule from today onwards. I will be recognize by my new name i.e. Ahmedi Mohammed Shafi Hamdule As per affidavit Reg. no. (M-22202427) the Near Petrol Pump. Pail Mohallah. At Post Vihoor Taluka Murud Janjira. Dist- Raigad, Maharashtra.

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
E-TENDER NOTICE
MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

RFx No.	Description	Est. Cost
Tend-56/22-23 **RFx No. 7000025907**	Supply & Installation of WTI and OTI of ICT and EHV Transformers at various substations under EHV (O&M) Circle, Panvel.	Rs. 28.88 Lakh
Tend-58/22-23 **RFx No. 7000025909**	Work of shifting of control & relay panels at 100kV Taloja and 220kV ONGC substations under EHV (O&M) Division, Panvel.	Rs. 36.47 Lakh

EMD 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/- + GST **Submission of Bids:** From 03.02.2023 to 12.02.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 13.02.2023 @ 11:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006220. e-mail ID: **se7200@mahatransco.in**
Sd/-
Superintending Engineer
EHV (O&M) Circle, Panvel

रामभाऊ कदम यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

रायगडा जिल्ह्यातील पाभरे (ता. म्हसळा) येथील मूळ रहिवासी रामभाऊ गणपत कदम (८२) यांचे बोरीवली-मुंबई येथील राहत्या घरी मंगळवार दि. ३१ जानेवारी रोजी पहाटे ३.३० वा. च्या सुमारास वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बोरीवली येथील स्मशानभूमीत सायंकाळी पाच वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी लता कदम, मिलिंद व मंदार ही दोन मुले, माधुरी दिलीप जाधव व मनीषा चेतन जाधव या दोन विवाहित मुली तसेच सुना, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी गुरुवार ९ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथे होणार असून, उत्तरकार्य रविवार, १२ फेब्रुवारी रोजी बोरीवली येथील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती कदम कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

वाढत्या थंडीमुळे आंबा पिकाला दिलासा

शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त

। पाताळगंगा । वार्ताहर ।

थंडीच्या वाढत्या प्रमाणामुळे आंब्यांना मोहोर येण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असून, अनेक ठिकाणी गावरान आंब्यांना मोठ्या प्रमाणात मोहोर आलेला पहावयास मिळत आहे. यामुळे यावर्षी मोठ्या प्रमाणात आंबे खावयास मिळणार आहेत.

मात्र वातावरणाच्या बदलामुळे दरवर्षी आंब्यांच्या मोहराला मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. मोहोर आल्याने फळधारणेतील फळांची गळती होत असल्याची स्थिती पहावयास मिळत आहे.

फळांची गळती थांबावी आणि मोहरचे

संरक्षण व्हावे, यासाठी औषधांची फवारणीची लगबग शेतकरी वर्गात सुरू आहे. मोहोर चांगल्या प्रमाणात असल्याने शेतकरी समाधान व्यक्त करीत आहेत. मोहोरामध्ये फळधारणा झाली असून, काही ठिकाणी हिरव्या वाटाण्याएवढी, तर काही ठिकाणी आवळा व सुपारी एवढ्या आकाराची कैरी झाली आहे. सध्या आंबा फळे आकाराने लहान असली तरी काही दिवसातच कैरी बाजारात दाखल होण्याची शक्यता शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहे. हवामान बदलामुळे आलेला मोहोर गळून जाण्याची शक्यता शेतकरी वर्गांकडून वर्तवली जाता आहे.

वाचकांसाठी निवेदन
कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.
- मुख्य संपादक

वनराई बंधाऱ्यामुळे शिवार बहरले

भाजीपाल्याच्या उत्पादनात वाढ

शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

। पेण । वार्ताहर ।
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि उपविभागीय कृषी अधिकारी अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने पेण तालुका कृषी अधिकारी कार्यालय हे आधुनिक पद्धतीने शेती करण्यात नेहमी अग्रेसर असून, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे. दरम्यान, रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्यांनी श्रमदानातून वनराई बंधारे बांधले असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात भाजीपाल्याचे मळे फुलविले आहेत. यातून चांगले उत्पादन मिळणार असून, शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

दरम्यान, गौवळण वाडी येथे वनराई बंधारे बांधल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भाजीपाला उत्पादन घेण्यावर भर दिला आहे. त्याचबरोबर वृक्षलागवड, रोहयो अंतर्गत नारळ लागवड तसेच मूग, हरभर, चवळीचीही लागवड केली आहे. या पिकांची कृषी सहसंचालक ठाणे अंकुश माने यांनी पाहणी करीत समाधान व्यक्त केले. यावेळी त्यांनी शेतकरी आणि त्यांना मार्गदर्शन करणारे कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांचेसुद्धा कौतुक केले. वडगाव येथील मधुकर म्हात्रे यांचे स्फूर्ती प्रोडक्स येथे भेट देण्यात आली. तसेच अंतोरे गावातील रोहिदास पाटील यांची ट्रॅक्टर पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे व तालुका कृषी अधिकारी पेण कृष्णदेव सुरवसे, मंडळ कृषी अधिकारी पेण स्नेहल पाटील, कृषी पर्यवेक्षक संभाजी पोरे, कृषी सहाय्यक व्ही.एस. लाडगे व कृषी सहाय्यक मारुती शिंदे, अनंत पाटील हे उपस्थित होते. यावेळी देवजी वाघ, रामा होला, मंगलदास फसोळ, शांताराम चिंबारे, सखाराम ठोंबरा, कानू ठोंबरा, हिरामण वारगुडा आदी शेतकरी उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

नि व ड क

भारताचा पाक दौरा रद्द

नवी दिल्ली : यंदाच्या आशिया कपचा पाकिस्तान यजमान असून, सप्टेंबरमध्ये ही स्पर्धा खेळविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी भारत पाकिस्तानात जाणार नाही, अशी ठाम भूमिका बीसीसीआयने याआधीच घेतली होती. दरम्यान, शनिवारी बहरीनमध्ये बीसीसीआयचे सचिव जय शाह आणि पीसीबीचे अध्यक्ष नजम सेठी यांच्यात बैठक पार पडली. यानंतर या स्पर्धेसाठी पर्यायी स्थळाचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

हेजलवूड कसोटीला मुकणार

बँकॉक : भारताविरूद्धच्या कसोटी मालिकेला सुरूवात होण्यापूर्वीच ऑस्ट्रेलियाच्या संघाला दुखापतींनी ग्रासले आहे. अष्टपैलू खेळाडू कॅमेरून ग्रीन दुखापतग्रस्त झाल्याचे वार्ता ताजी असतानाच आता ऑस्ट्रेलियाची धडाडती तोफ म्हणून ओळख असलेला जॉश हेजलवूडदेखील पहिल्या कसोटीला मुकणार आहे, अशी माहिती ऑस्ट्रेलियन क्रिकेट व्यवस्थापनाने दिली. आफ्रिकेविरूद्धच्या सिडनी कसोटीत हेजलवूडच्या पायाच्या घोट्याला दुखापत झाल्याने तो पहिली कसोटी खेळू शकणार नाही.

महाराष्ट्र पाचव्यांदा विजेते

नवी दिल्ली : महाराष्ट्राचा खो-खो संघ पाचव्या खेलो इंडियामध्ये सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. महाराष्ट्र संघाने शुक्रवारी दिल्ली संघाला धूळ चारली. युवा कर्णधार नरेंद्र कातकडे, आदित्य कुडाळे आणि निखिल यांनी सर्वोत्तम अष्टपैलू कामगिरी करीत महाराष्ट्राने सोनेरी यशाची घोडदौड कायम ठेवली. यादरम्यान महाराष्ट्र महिला खो-खो संघ रौप्यपदकाचा मानकरी ठरला. महाराष्ट्र संघाला अंतिम फेरीत ओडिशाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला.

धवनच्या पत्नीला फटकारले

नवी दिल्ली : भारताचा धडाकेबाज सलामीवीर शिखर धवन आणि पत्नी आयेशा मुखर्जी यांचा घटस्फोट खटला सुरू आहे. दरम्यान, आयेशा आपली प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न करत असल्याची याचिका धवनने न्यायालयात दाखल केली होती. धवन विरुद्ध कुठेही आणि कधीही बदनामी करणारे वक्तव्य करु नयेत, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. याप्रकरणी दिल्लीच्या पटियाला हाऊस कोर्टात सुनावणी सुरु आहे.

बॉक्सर्सची सुवर्ण कामगिरी

नवी दिल्ली : खेलो इंडिया यूथ गेम्समध्ये महाराष्ट्राच्या मुष्टियुद्धांनी तीन सुवर्णपदकांची कमाई केली. महाराष्ट्राचे चार खेळाडू अंतिम फेरीत होते. यापैकी उमर अन्वर शेख, देविका घोरपडे, कुणाल घोरपडे या तिघा पुण्याच्या खेळाडूंनी सुवर्णपदकाची कमाई केली. उस्मान अन्सारीला पराभवाचा सामना करावा लागला. मुलांच्या विभागात महाराष्ट्र तिसऱ्या स्थानावर राहिले. युवा जागतिक विजेती देविकाने लौकिकाला जासेशी कामगिरी करीत ५२ किलो वजनी गटात सुवर्णपदक मिळविले.

कारखानदारांची डोकेदुखी वाढणार

आवास योजनेची कामे सुरू | औद्योगिक क्षेत्रात रहिवासी वसाहत उभारताना सिडकोला नियमांचा विसर

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

प्रदूषणप्रकरणी हरित लवादात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमुळे निर्बंधाचा सामना करीत असलेल्या तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारांची डोकेदुखी आणखी वाढण्याची शक्यता आहे. सिडको महामंडळाकडून औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखाने असलेल्या क्षेत्राला खेटूनच प्रधानमंत्री आवास योजनेची कामे सुरु करण्यात आल्याने, भविष्यात या ठिकाणी राहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या विरोधाचा सामना कारखानदारांना करावा लागणार असून, कारखानदारांच्या अडचणी वाढवणारा हा प्रकल्प उभारताना सिडकोने एमआईडीसीच्या नियमांचे उल्लंघन केले असल्याचा आरोप कारखानदार करीत आहेत.

राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्देशानुसार औद्योगिक वसाहत परिसरात बफर झोन असणे बंधनकारक आहे. या निर्देशनुसार औद्योगिक वसाहतीपासून पाचशे मीटर अंतरापर्यंत कोणत्याही प्रकारच्या गृहप्रकल्पाची उभारणी केली जाऊ शकत नाही. सिडकोने मात्र या निर्देशांकडे दुर्लक्ष करून हजारो घरे असलेल्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या कामाला सुरुवात केली असून, रासायनिक कारखान्यांना खेटून आलेल्या या प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यास या ठिकाणी राहण्यासाठी येणारे नागरिक आणि कारखानदारांमध्ये प्रदूषणाच्या मुद्द्यावरून संघर्ष होण्याची भीती कारखानदारांकडून व्यक्त होत आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातून होणाऱ्या प्रदूषणाचा मुद्दा गंभीर आहे. याविरोधात औद्योगिक क्षेत्रापासून तीन ते चार किलोमीटर अंतरावरील खारघर, कळंबोलीसारख्या वसाहतीमधील नागरिकदेखील आवाज उठवत आहेत. शेकापचे माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनीदेखील याविरोधात राष्ट्रीय हरित लवादात याचिका दाखल केली आहे. अशातच सिडको विभागाकडून कारखान्याना खेटून उभरण्यात येत असलेल्या प्रकल्पामुळे कारखानदार आणि नागरिकांमधील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील कारखानदारांची संघटना असलेल्या तळोजा मॅनिफॅक्चरिंग असोशियनने औद्योगिक क्षेत्रात नियमानुसार बफर झोन असावा याकरिता हरित लवादात याचिका दाखल केली असल्याची माहिती टीएमएचे अध्यक्ष शेखर शृंगारे यांनी दिली आहे. शासनाच्या नियमानुसार बफर झोनची मागणी कारखानदार करीत आहेत.

> औद्योगिक क्षेत्रा लगत गृह प्रकल्प असू नये असे निर्देश आहेत. सिडको या निर्देशांकडे दुर्लक्ष करत आहे. सिडको विभाग, महापालिका आणि एमआईडीसी या विभागामध्ये समन्वयाचा अभाव असल्यानेच अशा प्रकल्पना मंजुरी दिली गेली आहे.
> - सतीश शेट्टी. अध्यक्ष. तळोजा इंडस्ट्रियालिस्ट असोशियन.

> प्रदूषणा मुळे होणाऱ्या त्रासा विरोधात हरित लवादात याचिका दाखल आहे. याबाबतचा निर्णय येणे बाकी आहे. असे असताना परिसरातील वस्तुस्थिती लक्षात न घेता गृहप्रकल्प उभारून सिडको नागरिकांची दिशाभूल करत असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहे.
> - अरविंद म्हात्रे, याचिकाकर्ते माजी नगरसेवक, शेकाप

नाथभैरव झापला विजेतेपद

स्वयंभू हनुमान चिवे संघाचा केला पराभव

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

रायगड जिल्हा व सुधागड तालुका कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भैरिनाथ क्रीडा मंडळ वावे यांच्यावतीने कै. गणेशदादा यादव स्मृतिचषक तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन शनिवार, दि. ४ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नाथभैरव झाप या संघाने स्वयंभू हनुमान चिवे संघास पराभूत करून कै. गणेशदादा यादव स्मृतिचषकावर आपली मोहोर उमटवली.

या स्पर्धेसाठी आ. अनिकेत तटकरे आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण यू ट्यूब चॅनेलवरून करण्यात आले होते. या मंडळाने सुसज्ज क्रीडांगणे तयार करून महिलांच्या प्रेक्षणीय सामन्यांचे आयोजनदेखील केले होते. महिला तसेच पुरुषांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

स्पर्धेतील विजयी संघास रोख रक्कम १५ हजार १ रु व आकर्षक चषक, तर उपविजेता स्वयंभू हनुमान चिवे संघास रोख रक्कम ११ हजार १ रु व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक कालभैरव आपटवणे संघास रोख रक्कम ७ हजार १ रु व आकर्षक चषक देऊन मंडळाच्या वतीने गौरविण्यात आले.

या स्पर्धेतील स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू यश सितापराव (झाप), उत्कृष्ट चढाईदार प्रणय तेलंगे (रासळ), उत्कृष्ट पकड शुभम दळवी (चिवे), पब्लिक हिरो सुमित मोरे (आपटवणे) या खेळाडूंना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

मोरा येथे क्रिकेट स्पर्धा

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील मोरा येथील ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड गोल्डन ज्युबली मैदान येथे नुकतेच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमित कौल यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यात ऑर्गोनिक प्रेस वॉरीयर संघ विजेता ठरला, तर व्हीस्ट्रीफाईड पॅथर संघ उपविजेता ठरला. त्यांना चषक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत १२ संघांनी सहभाग घेतला होता. समालोचक म्हणून चेतन स्वामी यांनी काम पहिले.

यावेळी ग्राइंडवेल नॉर्टन लिमिटेड कारखाना बिजनेस हेड कमलजीत सिंग, ॲडमीनचे सिनियर मॅनेजर आय.बी. सिंग, प्रोडक्शन मॅनेजर जहीर चौधरी, मॅनेजर सागर पारधी, सचिन वैद्य, मॅनेजर सुहानंद अरे, जिगनेश सोलंकी, राजेश पाटील, सुहानंद अरे, कामगार प्रतिनिधी मनोहर घरत, लक्ष्मण रेवने, दीपक शिंदे, गणेश पाटील यांच्यासह कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रिकेट स्पर्धेत हाशिवरे संघ विजयी

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील मांडवा येथील साईनाथ स्पोर्ट्स क्रिकेट क्लब मांडवापाडा यांनी दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी अशा तीन दिवस भव्य क्रिकेट स्पर्धा साईमंदिर मांडवा येथील क्रिकेट मैदानावर आयोजित केल्या होत्या. सदर स्पर्धेत अंतिम सामना फ्रेंड्स ग्रुप हाशिवरे संघ व टाकादेवी मांडवा संघ यांच्यात झालेल्या अटीतटीच्या लढतीत फ्रेंड्स ग्रुप हाशिवरे संघाने बाजी मारत प्रथम क्रमांक, तर द्वितीय क्रमांक टाकादेवी मांडवा संघाने पटकावला, तसेच जय गणेश पांथवणे संघाला तृतीय क्रमांकावर समाधान मानावे लागले.

या स्पर्धेचा बक्षीस समारंभ साईनाथ स्पोर्ट्स क्लब मांडवापाडाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

स्पर्धेत उत्कृष्ट मालिकावीर म्हणून पिंट्या पाटील-हाशिवरे, उत्कृष्ट फलंदाज म्हणून अक्षय पाटील-पांथवणे, तर उत्कृष्ट गोलंदाज म्हणून योगेश घरत-मांडवा याला गौरविण्यात आले. स्पर्धा पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

फावल्या वेळेत खो-खोचा सराव

। कर्जत । प्रतिनिधी ।

हल्ली विद्यार्थांच्या डोक्यावर शिक्षणाचे मोठे ओझे आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांचे मैदानी खेळ लोप पावत चालले आहेत. अशा वेळी काही विद्यार्थी मधल्या वेळात त्याचा आनंद घेत असलेले चित्र कर्जतमध्ये पाहायला मिळाले.

स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांची ओढाताण होत आहे, स्कूल संपली की प्रायव्हेट क्लासेसकडे कल वाढला आहे, त्यामुळे मैदानावर खेळायला जायला त्यांना वेळच मिळत नाही. मैदानी खेळाकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष होत आहे. मात्र, विद्यार्थ्यांमध्ये असलेली मैदानी खेळाची आवड अजूनही कमी झालेली नाही, असेच चित्र कर्जतमध्ये पाहायला मिळाले. कर्जत शहरातील इंग्लिश मीडियम स्कूलमधील विद्यार्थी स्कूलबसची वाट बघत असताना मधल्या वेळेत स्कूल बस स्टॉपच्या समोरच असलेल्या बंद दुकानांच्या शेडमध्ये खो-खो खेळाचा सराव करताना चित्र पाहायला मिळाले. हे चित्र आमच्या प्रतिनिधीने टिपले आहे.

कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्यासाठी एक धाव; 'गेल'कडून स्पर्धा

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गेकडून हिरवा झेंडा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

आपल्या कर्मचाऱ्यांचे स्वास्थ्य उत्तम राहावे या उद्देशाने गेल (इंडिया) लि. उसर कंपनीतर्फे दि. ५ फेब्रुवारी रोजी वरसोली बीच ते स्टेट बँक ऑफ इंडिया, अलिबाग अशा पाच कि.मी. अंतराची पॉलीरन २०२३ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते स्पर्धेला हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

यावेळी गेल कंपनीचे अनुप गुप्ता, मुख्य महाप्रबंधक (पीडीएचपी) तथा प्रभारी अधिकारी प्रवीण लोखंडे, महाप्रबंधक (पीडीएचपीपी) जतिन सक्सेना, महाप्रबंधक (मा.सं.) व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये बहुसंख्याक गेल कर्मचारी, इआईएल कर्मचारी, कॉन्ट्रॅक्ट कर्मचारी आदी सुमारे २०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी भाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणाऱ्या विजेत्यांना बक्षीसपत्र देऊन अनुप गुप्ता यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विविध गटात अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविलेल्या विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. लहान मुले गट- शाश्वत म्हात्रे, अमेय म्हात्रे, एन नमिश विकास. लहान मुली गट- रिया एस.वी., अनुश्री गोरडे, धनश्री कुलकर्णी. पुरुष गट (४० वर्षाखालील) : प्रकाश जाधव, प्रसन्ना पवार, परमजित सिंह. महिला गट : निशू सक्सेना, एन निशा विकास, अनुराधा गुप्ता. पुरुष गट (४० वर्षांवरील) : समरकुमार पुरकायत, कृष्णा माळी, उत्तम गायकवाड. दरम्यान, गेल (इंडिया) लिमिटेड, उसर कंपनीतर्फे यशस्वीरित्या पॉलीरन-२०२३ स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल उसरचे प्रमुख अनुप गुप्ता, मुख्य महाप्रबंधक (पीडीएचपीपी) तथा प्रभारी अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

परवेझ मुशर्रफ यांचे निधन

। अलिबाग । वर्षा मेहता ।

दीर्घ आजारानंतर, पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि लष्करप्रमुख परवेझ मुशर्रफ यांचे आज यूएईच्या दुबईतील अमेरिकन रुग्णालयात अनेक वर्षे स्व-निर्वासित जीवन व्यतीत केल्यानंतर निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्याचा मृतदेह पाकिस्तानात परत आणला जाईल की नाही याबाबत अधिकृत माहिती नाही. मात्र, गेल्या वर्षभरापासून त्याचे कुटुंबीय त्यांना मायदेशी आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

एमायलोइडोसिस नावाच्या आजारामुळे मुशर्रफ यांचे अवयव निकामी झाले होते. हा रोग संयोजी ऊती आणि अवयवांना प्रभावित करतो, सामान्य कार्यामध्ये अडथळा आणतो. हा एक दुर्मिळ आजार आहे जो संपूर्ण शरीरातील अवयवांमध्ये आणि ऊतींमध्ये अमायलोइड नावाच्या असामान्य प्रथिनांच्या निर्मितीमुळे होतो. २००७ मध्ये माजी पंतप्रधान बेनझीर भुट्टो यांच्या हत्येसाठी मायदेशी आरोपांचा सामना करत असलेले मुशर्रफ गेल्या आठ वर्षांपासून दुबईत राहात आहेत. त्यांनी यापूर्वी उर्वरित आयुष्य त्यांच्या मायदेशात घालवण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि शक्य तितक्या लवकर पाकिस्तानला परतण्याची इच्छा व्यक्त केली होती.

SOCIAL MEDIA पडसाद

नजरकैदेत, श्रीमान मुशर्रफ यांना खटल्यांच्या महापुराचा सामना करावा लागला आणि त्यांच्यावर संविधानाचा विपर्यास केल्याचा आरोप होता. सुरुवातीला त्याला पाकिस्तान सोडण्यापासून रोखण्यात आले, परंतु मार्च २०१६ मध्ये त्याचे नाव एक्झिट कंट्रोल लिस्टमधून काढून टाकण्यात आले आणि त्यांना दुबईला जाण्याची परवानगी देण्यात आली.

विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन

जीवनात यशप्राप्तीसाठी प्रयत्नात सातत्य हवे

। म्हसळा । वार्ताहर ।

जीवनात यश प्राप्त करायचे असेल तर प्रयत्नात सातत्य राखणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन समाज कल्याण कोकण विभागाचे उपायुक्त प्रमोद जाधव यांनी केले. म्हसळा तालुक्यात रवीप्रभा मित्र मंडळ संस्था रायगड यांच्या विद्यमाने दहावी ते पदवीधर विद्यार्थ्यांकरिता एमपीएससी, यूपीएससी मार्गदर्शन शिबीर न्यू इंग्लिश स्कूल म्हसळा येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी श्री. जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

उपायुक्त प्रमोद जाधव यांचे प्रतिपादन

जाधव पुढे म्हणाले की, विशेष मुलाखतीत कसे सामोरे जावे, स्पर्धा परीक्षा देत असताना अभ्यासाची रूपरेषा कशी असावी, मोजका अभ्यास कसा करावा, मुलाखती घेणाऱ्या अधिकाऱ्यांसमोर आपली शिस्तप्रियता कशी असावी, वृत्तपत्राचे वाचन करताना कसे वाचन करावे याबाबत महत्वाचे असणाऱ्या बाबी बाजूला काढून संग्रह करावा अशा अनेक प्रकारच्या मार्गदर्शक सूचना व आपल्या आयुष्यात आलेल्या मुलाखतीचा आढावा अचूक शब्दांत सांगितला.

कार्यक्रमासाठी उपायुक्त समाज कल्याण विभाग प्रमोद जाधव, म्हसळा तहसीलदार समीर घारे, गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ, म्हसळा पोलीस निरीक्षक संदीपान सोनावणे, म्हसळा नगर पंचायत मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड, न्यू इंग्लिश स्कूल चेरअमन समीर बनकर, मुख्याध्यापक प्रकाश हाके, उद्योगपती नंदकुमार सावंत, गौरव पोतदार, आशिष शिंदे, प्रदीप कदम, स्वप्नील लाड, सुशांत लाड, संतोष सुर्वे, संतोष उद्धरकर, महिला दक्षता अध्यक्षा रेखा धारिया, कुमारी अडागळे, दिलीप कांबळे, विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले.) दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com /
जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)